भारतीय प्रज्ञासत्ताकदिन ( २६ जानेवारी ):- विद्यापीठाच्या वतीने भारतीय प्रजासत्ताकदिन दि. २६. ०१.२०१६ रोजी इतिहास वस्तुसंग्रहालयाच्या हिरवळीवर मा. कुलगुरू प्रोफेसर बी.ए. चोपडे हस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला.

दिनांक ३०. ०१.२०१६ रोजी हुतात्मा दिनानिमित्त हुतात्म्यांना सायरन वाजवून मा. कुलगुरू सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी-कर्मचारी व विद्यार्थी यांनी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

दि. १ फ्रब्रुवारी २०१६ रोजी सी. फार्ट हॉलमध्ये मराठवाड्यातील पाणी प्रश्न व उपाय योजना या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. श्री. राजेंद्र सिंह, जलतज्ञ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व या कार्यक्रमास मा. आ. श्री अतुल सावे व मा. आ. भाऊसाहेब चिकटगावकर, विधानसभा सदस्य तथा अधिसभा सदस्य, मा. श्री. एन, श्रीराम अध्यक्ष, सी, आय, आय, मा.डॉ उमाकांत दांगट, विभागीय आयुक्त, डॉ. सतीश चव्हाण, नागपूर व मा. कुलगुरू प्रोफेसर बी.ए. चोपडे उपस्थित होते.

दि. ६ फेब्रुवारी २१६ रोजी व्ही. आर. सावंत यांच्या स्मृतिप्रित्यार्थ आयोजित कार्यक्रमात मा. न्या. श्री. शरद बोबडे ( सर्वोच्च न्यायालय), मा. गोपाल गांधी यांचे (Mother India Changing Image ) या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमास मा. कुलगुरू प्रोफेसर बी. ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते.

दि. ०७ फेब्रुवारी २०१६ ते १४ फेब्रुवारी २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन गेवराई (कुबेर) येथे करण्यात आले. स्वयंसेवकांनी गावामध्ये जलसंधारणाचे काम पुर्ण केले. यावेळी प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मा. कुलसचिव, डॉ. मुरलीधर लोखंडे, डॉ. सुहास मोराळे, संचालक, विद्यार्थी कल्याण, डॉ.

राजेश करपे, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. टि. आर पाटील, राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. पुरूषोत्तम देशमुख कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना व डॉ. ओमप्रकाश जाधव, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना हे उपस्थित होते.

दि. ०८ फेब्रुवारी २०१६ रोजी विद्यापीठ परिसरातील वसतिगृहामध्ये मानसिक आजार व उपाय योजना या विषयावर पोस्टर प्रदर्शन चे आयोजन करून विद्यार्थ्यांचे समुपदेश करण्यात आले होते.

दि. १५ ते १९ फेब्रुवारी २०१६ दरम्यान मैसुर विद्यापीठ, मैसुर येथे राष्ट्रीय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या मध्ये आपल्या विद्यापीठाचा श्री. पंकज लोखंडे विद्यार्थी कलावंत सहभागी होवून मृदमुर्तीकला या प्रकारामध्ये तृतीय पारितोषिक प्राप्त करण्यात आले.

दि. १८फेब्रुवारी २०१६ रोजी विद्यापीठाच्या नाटयगृहामध्ये सायंकाळी ६.०० वाजता मा. शिवशाहीर आप्पासाहेब ुगले यांच्या पोवाडयाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दि. १९ फ्रेब्रुवारी २०१६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विद्यापीठ प्रवेशद्वार ते विद्यापीठ नाट्यगृहा पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राची मिरवणुक काढण्यात आली. त्यानंतर मुख्य कार्यक्रम विद्यापीठाच्या नाट्यगृहामध्ये सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आला. सदरील कार्यक्रमास मा. अमर हबीब, जेष्ठ पत्रकार यांचे शेतकऱ्यांचे राजे छत्रपती शिवाजी या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदरील कार्यक्रमास मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते.

दि.२३ फेब्रुवारी २०१६ रोजी सी.फार्ट हॉलमध्ये रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मेट्रो आणि विद्यार्थी कल्याण विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सौहार्दता परिषद आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये भारतासह बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, नायजेरिया आदि देशांतील प्रतिनिधी यात सहभागी झाले होते. रोटरीचे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. दिपक पोफळे यांच्या हस्ते उद्घाटन झोले. मा. कुलगुरु,प्रोफेसर डॉ.बी. ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी रोटरी इंटरनॅशनच्या अध्यक्षांचे प्रतिनिधी रो. शशी वखंडकर मा. बिग्रेडियर श्री. ए. के. कार्ला, औरंगाबाद एन. सी.सी. गृप यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि.०५ मार्च २०१६ रोजी मा. पी. बी. सावंत, माजी न्यायमुर्ती सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमास मा.कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते.

दि. ०८ मार्च २०१६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यामानाने पोलीस आयुक्तालय, मिल कॉर्नर, औरंगाबाद येथून सकाळी ठिक ६.३० वाजता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे समारोप विद्यापीठ नाट्यगृहामध्ये सकाळी ठिक ८.३० वाजता झाला त्यानंतर विद्यापीठ नाट्यगृहामध्ये मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे, मा. श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. प्रतिमा परदेशी, राज्यशास्त्र विभाग, आबासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे यांचे भारतीय स्त्री मुक्ती संर्घ : इतिहास आणि आव्हाने विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

दि. १२ मार्च २०१६ रोजी छत्रपती शिवाजी मुलांचे वसतिगृह १ मध्ये यशवंतराव चव्हाण यांची जयंती निमित्त डॉ. विलास खंदारे यांनी विशेष व्याख्यान दिले. कार्यक्रमानंतर डॉ. सुहास मोराळे, संचालक विद्यार्थी कल्याण यांनी

वसतिगृहातील वास्तव्य करणाऱ्या मुलांच्या रुमच्या नंबरच्या चिठ्या एकत्र करुन त्यापैकी विद्यार्थ्यांनी काढलेला बंचमधून रुम नंबर दोनमध्ये पूर्ण रात्रभर थांबून मुक्काम केला. विद्यार्थ्या समवेत रात्रीचे स्नेह भोजन करुन त्यांच्या अडी-अडचणी समजुन घेतल्या व अभिनव उपक्रम घेतला.

दि. १४ मार्च ते २१ मार्च २०१६ दरम्यान विद्यापीठ परिसरातील वस्तीगृहामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ वस्तीगृह अभियान उपक्रमाचे आयोजन करुन यामध्ये स्वतंत्र वस्तीगृह निहाय बेस्ट रुम अवॉर्ड व हॉस्टेल नं १, २, ३ अशी स्पर्धा घेऊन स्वच्छता या विषयामध्ये लोकसहभागाचे महत्त्व सांगितले गेले.

दि. १६ मार्च २०१६ रोजी मुख्य निवडणूक आयुक्त, निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यलयामध्ये विद्यार्थी मतदार नोंदणी अभियान व मतदान जनजागृती अभियानासाठी सर्व विद्यापीठांचे कुलगुरु व संचालक, विद्यार्थी कल्याण यांची बैठक झाली. मा. प्रोफेसर बी. ए. चोपडे, कुलगुरु व डॉ. सुहास मोराळे, संचालक विद्यार्थी कल्याण यांनी सहभाग घेऊन विद्यापीठाच्या वेबसाईट वरील पेजवर मतदान जागृतीचा मजकूर फ्लॅश करुन परिपत्रक काढले.

दि. २७ मार्च २०१६ रोजी ५६ वा दिक्षांत समारंभ विद्यापीठ नाट्यगृहामध्ये आयोजित करण्यात आला. सदरील कार्यक्रमामध्ये डॉ. धीरेंद्रपाल सिंग, नॅक संचालक यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला यावेळी मा.कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

विद्यापीठ विभागाचे व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संविधान जागृती बाबत ऑनलाईन स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या असून एमकेसीएल यांच्यावतीने दोन लाख रुपयांचे बक्षिस विजेत्या स्पर्धकांना घोषित केलेले आहे.

दि. ०१ एप्रिल २०१६ ते दि. १० एप्रिल २०१६ दरम्यान विद्यार्थ्यांनी विद्यापीठामध्ये भीमोत्सव २०१६ चे आयोजन करुन विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.

दि. ०७ एप्रिल २०१६ रोजी ग्रंथालयामध्ये १८ तास अखंड वाचन, उपक्रमाचे आयोजन केले.

दि. ११ एप्रिल २०१६ रोजी महात्मा जोतिबा फुले जयंती निमित्त विद्यापीठ नाट्यगृहामध्ये मा. प्राचार्य सोमनाथ रोडे, जेष्ठ विचारवंत, लातुर यांचे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक परिवर्तन या विषयावर व मा. प्रा. रविंद्र ठाकुर, जेष्ठ साहित्यिक यांचे महात्मा जोतिबा फुले आंबेडकरी विचारधारेचे अग्रदुत या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते.

दि. १२ एप्रिल २०१६ रोजी मा. प्रोफेसर बी. एन. संदानशिव, माजी सदस्य, भारतीय विधी आयोग यांचे राजर्षी शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर विशेष व्याख्यान व मा. बाबा भांड, जेष्ठ साहित्यिक, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ यांचे महाराजा सयाजीराव गायकवाड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा. श्रीमंत छत्रपती शाहु महाराज, राजर्षी शाहु महाराज यांचे वंशज हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे यांनी भूषविले.

दि. १२ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता विद्यापीठ नाट्यगृहामध्ये गाथा भीमरायाची बुद्ध भीमगीताची सुरेल मैफल बुद्धरत्न लिहीतकर व कलावंत संघ यांनी सादर केले.

दि. १३ एप्रिल २०१६ रोजी मा. गंगाधर पानतावणे, जेष्ठ साहित्यिक व थोर विचारवंत, पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, औरंगाबाद यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र विषयक विचार या विषयावर विशेष

व्याख्यान व मा. डॉ. कुमार शास्त्री, तज्ञ सदस्य, सी.सी.आर.टी. भारत सरकार, दिल्ली, अर्थशास्त्र नागपूर यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थचिंतन या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

दि. १३ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता विद्यापीठ नाट्यगृहामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संगीत विभाग निमित्त गीत भीमायान या संगीत कार्यक्रमाचे आयोजन डॉ. संजय मोहड व विद्यार्थी वृंद यांनी केले.

दि. १४ एप्रिल २०१६ रोजी सकाळी ५.३० वाजता विद्यापीठ नाट्यगृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संगीत विभाग निमित्त भीमस्वरपहाट या संगीत कार्यक्रमाचे आयोजन डॉ. संजय मोहड व विद्यार्थी वृंद यांनी केले.

दि. १४ एप्रिल २०१६ रोजी सकाळी ६.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते विद्यापीठ प्रवेशद्वार ते पानचक्की ते ज्युबलीपार्क ते बेगमपूरा ते जयसिंगपूरा ते विद्यापीठ प्रवेशद्वार पर्यंत समता दौड चे आयोजन क्रिडा विभागातर्फे करण्यात आले होते.

दि. १४ एप्रिल २०१६ रोजी सकाळी ८.०० वाजता विद्यापीठ प्रवेशद्वार पासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मा. कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे, प्रोफेसर मुरलीधर लोखंडे, कुलसचिव, प्रोफेसर के. व्ही. काळे, संचालक, बीसीयुटी, डॉ. सुहास मोराळे, संचालक, विद्यार्थी कल्याण व विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. १४ एप्रिल २०१६ रोजी विद्यापीठ नाट्यगृहामध्ये मा. डॉ. जनार्धन वाघमारे, रोजी माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व मा. बी. एन. देशमुख माजी न्यायमुर्ती, औरंगाबाद व मा. कुलगुरू प्रोफेसर बी. ए. चोपडे यांच्या हस्ते खालील ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

दि. १५ एप्रिल २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ नाट्यगृहामध्ये मा. डॉ. जनार्धन वाघमारे माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे युगपुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर विशेष व्याख्यान व मा. बी. एन. देशमुख,माजी न्यायमुर्ती, औरंगाबाद यांचे भारतीय राज्यघटना व न्याय व्यवस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होत. सदरील कार्यक्रमास मा. कुलगुरू प्रोफेसर बी. ए. चोपडे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

**स्वातंत्र्याची ६८ वर्षे**

भारताला स्वातंत्र्य मिळुण ६८ वर्षे झाली. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक क्रांतीकारी, स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. स्वराज्य मिळवण्यासाठी टिळक, गांधी, पटेल, सुभाषचंद्र बोस या नेतृत्त्वाखाली अनेक जण स्वातंत्र्याच्या लढाईत धारातीर्थी पडले, देशासाठी आपले बलिदान दिले. स्वराज्याच स्वप्न अखेर १५ ऑगस्ट १९४७ ला सत्यात उतरले. ब्रिटिश राजवटीतून भारत स्वतंत्र झाला. At the stoke of the midnight hour, when the world sleep, India will awake to life and freedom. A moment cemes but rearly in history, when we steop out from old to the new. India discovers herself again...Pandit Nehru स्वातंत्र्य दिनाच्या पुर्व संध्येला पंडित नेहरूंनी दिलेल्या भाषणात भारताने स्वातंत्र्यासाठी केलेला संघर्षमयी प्रयास उलगडला आणि त्याबराबराच भारताने आपले स्वातंत्र्य परत मिळविल्याचं जगाला सांगीतल. भारत जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जाते. भारतात असलेल्या सांस्कृतीक तसेच धार्मिक विविधतेमुळे भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा अनेकांनी भारत हा देश एकसंध राहणार नाही असे भाकीत वर्तवले होते. परंतु विविधतेत एकता हेच भारताचे वैशिष्ट्ये ठरले आणि आज ६८ वर्षाच्या स्वातंत्र्योत्तर वाटचालीला भारताच्या एकात्मतेला कुठेही तडे गेले नाहीत (अपवाद काही धार्मिक संघटना) भारताने तंत्रज्ञान, विज्ञान, शेती शिक्षण असा विविध क्षेत्रात प्रगती केली. आज भारताकडे स्वत:चा आण्विक साठा आहे. भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असल्याच म्हटल जातय.

भारत ज्या वेगाने प्रगती करत आहे त्या किंबहुना त्याच्या दुप्पट वेगाने समस्यांनी वेढला गेला आहे. प्रश्न पडतो की खरच आपण स्वतंत्र आहोत का? ब्रिटिश राजवटीतून आपण कधीच मुक्त झालो. पण महागाई, दहशतवाद, भ्रष्टाचार, स्वैराचार यात मात्र अडकलो आणि यातून दिवसेंदिवस बाहेर पडणे कठिण होत चाललयं. परदेशांशी लढणे सोपे आहे पण स्वकियांशी तितकेच कठीण.

आपल्याला महान आणि तडफदार नेते, राजकारण्यांचा इतिहास आहे. पण खेद याचा वाटतो की, या इतिहासाची पुनरावृत्ती होत नाहीये. आज आपल्या देशात भ्रष्टाचार बोकाळला आहे की आणखी काही दिवसांनी तो एक शिष्टाचार होतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे. स्टॅम्प पेपरपासून ते चारा घोटाळा या सारखा अनेक घोटाळ्यात माननीय मंत्री अडकलेले आहेत. हे कमी की, काय मंत्री महोद्यांनी राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात घालून आपली घोटळ्याची परंपरा चालू ठेवली आणि बोफोर्स आणि मिग २१ विमान खरेदी पर्यंत मजल मारली ही अत्यंत शरमेची बाब आहे. घोटाळ्याची व्यापकता आणि विविधता राखण्यात मात्र त्यांनी सातत्य राखल. राष्ट्रपिता गांधीजींच्या अहिंसेच्या चळवळीपूढे ब्रिटीशांनाही झुकावे लागले. गांधीजींच्या तत्वज्ञानाचा आजही पुरस्कार केला जातो. पण आज त्याच गांधीजींच्या देशात त्यांच्याच तत्वज्ञानावर आधारलेले भ्रष्टाचारविरोधी आंदोलन अण्णांना गुंडाळाव लागत ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. महागाई, भ्रष्टाचार, दहशतवाद, यांची झळ बसणारा माणूस बोथट झाला आहे. किती आणि कोणाला प्रतिकार करणार म्हणून एकतर सहन करणे नाहीतर वितरणे असा पवित्रा त्यांनी घेतला आहे.

शिवाय ते जगूच शकत नाही. नुकतेच पुण्यात झालेले स्फोट त्यानंतर सी. एस. टी. वर झालेला हिंसाचार ही याची ताजी उदाहरणं आहेत. देशातल्या जनतेच्या सहनशक्तीला खरच दाद द्यायला हवी. आपल्या देशातल्या राजकारण्यांना जनतेचे प्रश्न सोडवण्यापेक्षा ते तेवत ठेवणे सोयिस्कर वाटते. एवढच नव्हे तर थेट परदेशी मासिकाने आपल्या नेत्यांना राज्यकारभारात नापास कराव, एवढी केवढी नामुष्की.

आर्थिक महासत्तेची स्वप्न बघणाऱ्या भारतात दारिद्र्यरेषेखालील जनतेला अन्न. निवारा या जीवनावश्यक गोष्टीची भ्रांत आहे. आपल्या तिरंग्यातील तीन रंग शांतता, सामर्थ्य, सुबत्ता यांचे प्रतिक आहे. भगवा सामर्थ्यांच, पांढरा शांततेचे आणि हिरवा सुबत्तेच, आज तिरंगा फडकवताना मनात येत की खरच भारतात शांती आहे? महासत्ता बनण्याचे सामर्थ आहे? शेतकऱ्याच्या आत्महत्या होणाऱ्या कृषीप्रधान भारत देशात सुबत्ता आहे? आज स्वातंत्र्य दिन नागरिकांसाठी हॉलिडे झाला आहे.

यादिवशी ड्राय डे असुनही पर्यटन स्थळी मद्यपींना आवर घालण्यासाठी पोलीस बंदोबस्तात वाढ करावी लागले. खरच स्वातंत्र्य कधी कळणार आपल्याला. कदाचित आपण आणखी ९ वर्षांनी स्वातंत्र्यपुर्तीची ७५ वी धुमधडाक्यात साजरी करू पण तेव्हा चित्र बरेच पालटले असेल अशी आशा व्यक्त करू या.

जहां डाल डाल पर सोने की चिडीया करती है बसेरा ।

वो भारत देश है मेरा ।

या ओळी प्रत्यक्षात उतरवण्यासाठी पुन्हा एकदा क्रांती घडणं आवश्यक आहे तरच महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार होईल.

**कल्पना भागवत**

विद्यार्थी विकास

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

औरंगाबाद.

| | |
|---|---|
| १ | **नवयुगनिर्माते : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**<br>मुख्य संपादक, प्रोफेसर बी. ए. चोपडे, कुलगुरू<br>अतिथी संपादक - ज. वि. पवार, संपादक डॉ. उत्तम अंभारे व डॉ. सुहास मोराळे |
| २ | **आम्ही पाहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर**<br>मुख्य संपादक : प्रोफेसर बी. ए. चोपडे,<br>संपादक : वि. ल. धारूरकर |
| ३ | **Dr. Babasaheb Ambedkar : Culture Heritage and Tourism**<br>लेखक : डॉ. राजेश रगडे |
| ४ | **महामानव : आंबेडकरी कविंचा आविष्कार**<br>संपादक संजय गमरे, डॉ. उत्तम अंभारे |
| ५ | **Exotic Flowering Plants of Maharashtra -1**<br>संपादक डॉ. विनोद जोगदंड, प्रोफेसर अरविंद धाबे |
| ६ | **जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेले विद्यार्थ्यांचे बाबासाहेब**<br>संपादक : प्रताप अवचार, क्षितीजा भुमकर |
| ७ | जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेले मानवतेचा महानायक<br>संपादक : अमरदीप वानखेडे |
| ८ | **रंगीत दिनदर्शिकेचे विमोचन** |
| ९ | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संगीत विभाग प्रस्तुत**<br>डॉ. संजय मोहाड व विद्यार्थी वृंद सादर<br>गीत भीमायन च्या ध्वनिमुद्रित सी. डी. चा शुभारंभ |

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासातील / त्यांच्या सोबत काम केलेल्या खालील मान्यवरांना विद्यापीठाच्या वतीने सन्मानपत्र देवून दि. १४ एप्रिल २०१६ रोजी मुख्य कार्यक्रमात सत्कार करण्यात आलेला आहे.

## अ. क्र. मान्यवरांचे नाव

१ **मा. भुजंगराव कुलकर्णी**
हॉटेल स्वामी बाबा पेट्रोल पंपाजवळ,
पिअन्ट ट्रॅव्हल चौक, औरंगाबाद.

२ **मा. ॲड्. भगवानराव देशपांडे**
गजानन महाराज मंदिर जवळ,
औरंगाबाद.

३ **मा. गंगाधर गाडे**
नागसेन नगर, पीर बाजार रोड,
उस्मानपुरा, औरंगाबाद.

४ **मा. डॉ. गंगाधर पानतावणे**
''श्रावस्ती'' मिलिंद महाविद्यालया समोर,
छावणी, औरंगाबाद.

५ **मा. शिवराम जाधव**
गड्डीगुडम, छावणी
औरंगाबाद

६ **मा. प्रा. त्र्यंबक महाजन**
महाजन कॉलनी, एन-२
सिडको, औरंगाबाद

७ **मा. पाशाभाई आमिन**
टाऊन हॉल,
औरंगाबाद.

८ **मा. डॉ. विठ्ठलराव घुगे**
''पूर्णतत्व'' विजयश्री कॉलनी, एन-१५
सिडको, औरंगाबाद.

९ **मा. पद्मश्री डॉ. यु . म. पठाण**
कोटला कॉलनी, आनंदनगर बेगमपुरा
पोलिस स्टेशन जवळ, औरंगाबाद

१० **मा. अंकुशकुमार कदम**
नंदनवन कॉलनी,
म.न.पा. आरोग्य केंद्रासमोर,
औरंगाबाद

११ **मा. डॉ. प्रभाकर मांडे**
द्वारा अविनाश मांडे, प्लॉट नं. १२३,
साधना हाऊसिंग सोसायटी, प्रोफेसर चौक,
पटवर्धन स्मारका जवळ, कावेरी
अहमदनगर ४१४००३

१२ **मा. ताहेरभाई**
द्वारा मंहमदभाई फोटोग्राफर
सिटी चौक, औरंगाबाद

१३ **मा.प्रविण भाऊसाहेब मोरे**
पोलिस उपाधिक्षक

- व्याख्यानमाला : विद्यापीठातर्फे दरवर्षी खालील व्याख्यानमाला विद्यापीठ शैक्षणिक विभाग, विद्यापीठ उपकेंद्र, उस्मानाबाद व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येतात. १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला, २) महात्मा गांधी व्याख्यानमाला, ३) राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला, ४) डॉ. मोईन शाकीर व्याख्यानमाला, ५) डॉ. जगदीशचंद्र बोस व्याख्यानमाला, ६) डॉ. सी. व्ही रमण व्याख्यानमाला व ७) स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला.
- कार्यशाळा व शिबिरे :- विद्यापीठातर्फे दरवर्षी खालील कार्यशाळा व शिबिर विद्यापीठ शैक्षणिक विभाग, विद्यापीठ उपकेंद्र उस्मानाबाद व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येतात. १) नवोदित लेखंकासाठी कार्यशाळा, २) नाट्य प्रशिक्षण शिबिर, ३) पर्यावरण, संरक्षण प्रशिक्षण शिबिर ४) व्यसनमुक्ती महाविद्यालयीन स्पर्धा, ५) उद्योजकता विकास कार्यशाळा, ६) युवक नेतृत्त्व शिबिर व ७) विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर.

- **सेवागौरव समारंभ :-** दरवर्षी विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सेवागौरव प्रत्येक महिन्यांच्या शेवटच्या तारखेला केला जातो. सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, व पुष्पगुच्छ देवून मा. कुलगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात येतो.

- **कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना : अ)** कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संकल्पनेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये कै.वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना विद्यार्थी कल्याण विभागातर्फे राबवली जाते. या योजनेचा फायदा गरीब, होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांना होत आहे. या योजनेअंतर्गत सन २०१५-१६ या वर्षात एकूण ५६७ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला यात पदव्युत्तर वर्गाचे ४३४ व एम.फील./ पीएच.डी. करणाऱ्या ३६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. या योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबवले जातात.

- **ब) संलग्नीत महाविद्यालयांना प्रोत्साहनपर अनुदान :**

व्यवस्थापन परिषदेने दि. २६ व २७ फेब्रुवारी २००८ रोजी ठराव पारीत केला की, प्रायोगिक तत्त्वावर संलग्नीत महाविद्यालयात कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा व शिका) सुरु करावी व या योजनेकरिता अर्थसंकल्पना रु.५,००,०००/- ची तरतूद करण्यात आली. विविध प्रक्रियेनंतर शैक्षणिक वर्षे २०१५-१६ करिता खालील महाविद्यालयांना ही योजना मंजूर करण्यात आली व संबंधित महाविद्यालयांना प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्यत आले.

**औरंगाबाद जिल्हा २०१५-२०१६**

| **अ.क्र.** | **महाविद्यालयांचे नांव** |
|---|---|
| १ | श्री.संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री जि.औरंगाबाद |
| २ | जीवन विकास महाविद्यालय, ता.वैजापूर जि.औरंगाबाद |
| ३ | शिवाजी कला व वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, कन्नड जि.औरंगाबाद |
| ४ | शिवछत्रपती महाविद्यालय, सिडको एन-३, औरंगाबाद |
| ५ | विद्याधन कॉलेज, औरंगाबाद |
| ६ | यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड, जि.औरंगाबाद |
| ७ | माणिकचंद पहाडे विधि महाविद्यालय, औरंगाबाद. |
| ८ | शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद |
| ९ | राजर्षी शाहु कला व विज्ञान महाविद्यालय, वाळुज, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद |

| | |
|---|---|
| १० | मिलिंद विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद |
| ११ | दगडोजीराव देशमुख कला व विज्ञान महाविद्यालय, एम.आय.डी.सी., वाळुज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद |
| १३ | डॉ. जी. वाय. पाथ्रीकर संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद |

**जालना जिल्हा**

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर ता. अंबड जि. जालना |
| २ | राजर्षी शाहु कला, वाणिज्य वविज्ञान महाविद्यालय, पारध ता. भोकरदन जि. जालना |
| ३ | बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना |
| ४ | सिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफ्राबाद जि. जालना |
| ५ | आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धावडा ता. भोकरदन जि. जालना |
| ६ | कला व विज्ञान महाविद्यालय, कु. पिंपळगाव ता. घनसावंगी जि. जालना |
| ७ | मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन जि. जालना |
| ८ | गोदावरी कनिष्ठ व वरिष्ठ कला महाविद्यालय, अंबड, जि. जालना |
| ९ | राष्ट्रमाता इंदिरा गांधी कलना, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना |

**बीड जिल्हा**

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १ | वसुंधरा कॉलेज, घाटनांदुर, जि. बीड |
| २ | कला व वाणिज्य महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड |
| ३ | योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड |
| ४ | कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आष्टी जि. बीड |
| ५ | श्री. सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड |
| ६ | कालीकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शिरूर जि. बीड |
| ७ | कला वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय, किल्ले धारूर जि. बीड |
| ८ | पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा जि. बीड |
| ९ | आनंदराव धोंडे बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड |
| १० | केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर आलीयास काकु कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड |
| ११ | सुंदरराव सोळंके कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, माजलगाव जि. बीड |
| १२ | यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड |
| १३ | श्रीमती शांताबाई गांधी कला, अमोलक विज्ञान पन्नालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय, कडा ता. बाष्टी जि. बीड. |
| १४ | मानवलोक सोशल सायन्स महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड |
| १५ | शाम गदाळे वरिष्ठ महाविद्यालय, दहिफळ, ता. केज. जि. बीड |

१६ आर. बी. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई. बीड
१७ कला महाविद्यालय, नांदुरघाट, ता. केज, जि. बीड
१८ खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड
१९ बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड
२० स्व. सावरकर महाविद्यालय, बीड
२१ कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड.
२२ भगवान महाविद्यालय, आष्टी, जि. बीड

उस्मानाबाद जिल्हा

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव |
| --- | --- |
| १ | वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी, जि. उस्मानाबाद. |
| २ | रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद. |
| ३ | छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद. |
| ४ | श्री. शिवाजी महाविद्यालय, परंडा जि. उस्मानाबाद. |

- विद्यार्थी वसतिगृहे

विद्यापीठात एकूण पाच विद्यार्थी वसतिगृहे व एक विद्यार्थी विश्रामगृह आहे. या वसतिगृहाकरिता डॉ. नारायण पंडुरे, डॉ. मदनलाल सुर्यवंशी, डॉ. भास्कर साठे, डॉ. प्रभाकर उंद्रे व डॉ. ओमप्रकाश जाधव हे वसतीगृह अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

- विद्यार्थिनी वसतिगृहे :
- विद्यापीठ प्रांगणात तीन विद्यार्थीनी वसतिगृहे व प्रियदर्शिनी अशी चार विद्यार्थीनी वसतिगृहे आहेत. डॉ. सोनाली क्षिरसागर, प्रा. डॉ. भारती गवळी, डॉ. सविता बहिरट व डॉ. गिरीबाला बोंदळे या वसतिगृह अधीक्षिका म्हणून कार्यरत आहेत. या चार वसतिगृहात एकूण ३०० विद्यार्थिनींची राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रियदर्शिनी या वसतिगृहात शासकीय कोट्यातून ५० मुलींना प्रवेश देण्यात आला होता. शैक्षणिक वर्ष २०१५ - १६ करिता विद्यापीठ परिसरात रमबाई आंबेडकर अल्पसंख्याक मुलींचे नविन वस्तिगृह सुरू करण्यात आले आहे.

**डॉ. सुहास मोराळे**
संचालक
विद्यार्थी कल्याण

# राष्ट्रीय सेवा योजना

**समन्वयक :- डॉ. आर. एन. करपे**

केंद्र सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येते. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद या चार जिल्ह्यातील २५५ महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट कार्यरत असून नियमित कार्यक्रमासाठी ३३००० स्वयंसेवक तर विशेष शिबीर कार्यक्रमासाठी १६५०० स्वयंसेवक संख्या मंजूर करण्यात आली आहे. तसेच स्वयंनिर्वाही एकक योजनेअंतर्गत ३२०० संख्या आहे. या करिता महाविद्यालयीन स्तरावर ३७५ कार्यक्रमाधिकारी कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा समन्वयक व २२ विभागीय समन्वयक यांच्यामार्फत सन २०१५-१६ मध्ये विद्यापीठ रासेयो सल्लागार समितीच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम प्रभाविरित्या राबविण्यात आले. कोणत्याही कार्यक्रमाचे यश हे त्याच्या नियोजनावर अवलंबून असते, म्हणून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक डॉ. आर. एन. करपे यांनी औरंगाबाद, जालना, बीडा व उस्मानाबाद येथे कार्यक्रमाधिकारी यांच्याकरिता राज्यस्तरीय नियोजन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**जिल्हा नियोजन कार्याशाळा : -**

| अ.क्र. | दिनांक | जिल्हा | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | १५-९-२०१५ | उस्मानाबाद | रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद |
| २ | १६-९-२०१५ | बीड | श्री.पंडीतगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा जि.बीड |
| ३ | २२-९-२०१५ | औरंगाबाद | पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय, औरंगाबाद |
| ४ | २६-९-२०१५ | जालना | मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड जि.जालना |

# स्वच्छ भारत अभियान अहवाल २०१५-१६

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नीत राष्ट्रीय सेवा योजना एकक (युनिट) असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या २२६ एवढी आहे. या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची नियमित कार्यक्रमासाठी ३६२०० व विशेष शिबिरासाठी १८१०० ऐवढी मंजूर संख्या आहे.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांनी मुनिजन योजनेअंतर्गत दत्तक घेतलेल्या गावामधून विशेष शिबिरासाठी स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठी युवा ही संकल्पना राबविण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रमाद्वारे व विशेष शिबिरामध्ये स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत ग्रामीण व शहरी भागात महाविद्यालय परिसर, विद्यापीठ परिसर, शहरी व ग्रामीण भागातील सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. रासेयो नियमित्त व विशेष शिबीराच्या माध्यमातून अनुक्रमे ३६२०० व १८१०० रासेयो स्वयंसेवकांनी स्वच्छ भारत अभियानात सहभाग घेतला. रासेयोच्या नियमित्त व विशेष शिबीराच्या माध्यमातून स्वच्छता अभियानाअंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले.

**नियमित उपक्रम :-**

१. शहरातील झोपडपट्टी विभाग, पर्यटन स्थळे विद्यापीठ व महाविद्यालये परिसर इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

२. रॅली, पथनाट्याचे आयोजन करुन स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. विशेष शिबीराच्या माध्यमातून राबविलेले उपक्रम:-

३. मुनिजन योजने अंतर्गत दत्तक घेतलेल्या गावामध्ये रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, गावातील शाळा परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

४. नाले, गटारी यांची साफ सफाई करण्यात आली.

५. रॅली, पथनाट्य, भारुड, आदी सांस्कृतीक उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छतेबद्दल जनजागृती करुन महत्व पटवुन देण्यात आले.

६. श्रमदानातून शोषखड्डे तयार करण्यात आले.

७. ग्रामीण भागातील नागरीकांना शौचालयाचे महत्व पटवून देवून शौचालये बांधण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात आले.

**विशेष शिबीराच्या माध्यमातून राबविलेले उपक्रम :-**

१. मुनिजन योजनेअंतर्गत दततक घेतलेल्या गावामध्ये रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, गावातील शाळा परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

२. नाले, गटारी यांची साफ सफाई करण्यात आली.

३. रॅली, पथनाट्य, भारुडे, आदी सांस्कृतीक उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छतेबद्दल जनजागृती करुन महत्व पटवून देण्यात आले.

४. श्रमदानातून शोषखड्डे तयार करण्यात आले.

५. ग्रामीण भागातील नागरीकांना शौचालयाचे महत्व पटवून देवून शौचालये बांधण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

# महात्मा फुले प्रतिष्ठान

संचालक :- डॉ.स्मिता अवचार

महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने ०१ जून २०१५ ते ३१ मार्च २०१६ या शैक्षणिक वर्षामध्ये खालील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

१) ०३ जानेवारी २०१६ रोजी समाजशास्त्र विभागामध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. विभागातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

२) दि.०४/०१/२०१६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील 'महात्मा फुले प्रतिष्ठान' केंद्रामार्फत दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. १) कु.सोनाली देवरे (एम.फिल.) २) प्रकाश बावस्कर (पीएच.डी.) अशी विद्यार्थ्यांची नावे आहेत.

३) मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय व 'महात्मा फुले प्रतिष्ठाण' डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये दि.११ व १२ मार्च २०१६ रोजी ''महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाज विकासातील आर्थिक सामाजिक विचारधारा'' या विषयावर दोन दिवशीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे उद्घाटक म्हणून डॉ. महेन्द्र एम. केंद्रीय विद्यापीठ, कुलबर्गी कर्नाटक व प्रमुख अतिथी म्हणून डॉ.पी.जी. जोगदंड मुंबई विद्यापीठ मुंबई, श्री.अनिकेत लोहिया, कार्यावाहक मानवलेक हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.द्वारकादास लोहिया (बाबुजी) हे होते.

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आजच्या काळातील संदर्भ समजून घेण्यासाठी या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादामध्ये खालील प्रमाणे उपविषय होते.

१) महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक विकासाची विचारधारा.

२) वंचित घटकांसाठी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान.

३) महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक न्यायामधील भूमिका.

या प्रमाणे संत्राचे आयोजन करण्यात आले होते. समारोपाच्या सत्राचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया संस्थापक मानवलोक हे होते व प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. मधुकर इंगोले उपस्थित होते. प्रास्ताविक परिसंवादाच्या समन्वयक डॉ.रमा पांडे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांनी सर्वांचे आभार मानले व या कार्यक्रमाच्या शोधनिबंधाचे संपादन करुन सोविनियरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

दि.२८/११/२०१५ रोजी महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्ताने कुलगुरु प्रो.बी.ए.चोपडे यांच्या हस्ते पुष्पहार अपर्ण करण्यात आला.

दि.१०/०३/२०१६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृति दिनानिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करण्यात आला.

# विद्यापीठ उद्यान

विद्यापीठ उद्यान विभागाने या वर्षात भूगोल विभाग, रुसा विभाग व श्रीफळ उद्यान या ठिकाणी नवीन उद्यान तयार केली आहेत. तसेच विद्यापीठ परिसरात ३००० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

विद्यापीठात घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमानिमित्त शोभेच्या झाडांच्या कुंड्या पुरविणे, २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिन, मराठवाडा मुक्त संग्राम दिन, इत्यादी ध्वजावंदन कार्यक्रमासाठी उद्यान तयारी करणे, वृक्षारोपणाकरिता विविध विभागांना रोपांचा पुरवठा करणे, इ. कामे केली.

तसेच विद्यापीठ उद्यान अंतर्गत येणारे उद्याने- प्रशासकीय इमारती समोरील उद्यान, परीक्षा भवन उद्यान, सामाजिकशास्त्रे उद्यान, इतिहास वस्तु संग्रहालय उद्यान, विश्रामगृह उद्यान, नविन नाट्यगृह इमारत उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूतळा परिसर उद्यान, मध्यवर्ती सुविधा केंद्र उद्यान, कुलसचिव निवास, कुलगुरु निवास उद्यान इ. उद्यानांची देखभाल व सांभाळ करण्यात आला.

परिसर विकास अंतर्गत १४२ एकरवर फळबाग लागवड करण्यात आलेली आहे. सर्व फळझाड लागवड ही ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापनावर आधारित आहे. राष्ट्रीय फळबाग योजनेअंतर्गत या औद्योगिक फळबागेचा समावेश आहे. यामध्ये चिंच-पी.के. १-१५३० फळझाडे, आवळा - एन-७, एन-१० ही १४५ फळझाडे, सिताफळ - बालानग, ॲनोना ही ३००० फळझाडे, चिकू-कालापत्ती ४१५ फळझाडे व आंबा- केशरी, हापूस ही १३२५ फळझाडे आहेत. अशी एकूण ७२१५ आंबा, चिंच, आवळा, चिकू, सिताफळ ही फळझाडे सुस्थितीत व जोमाने वाढत आहेत. राष्ट्रीय फळबाग योजनेअंतर्गत लागवड करण्यात आलेल्या फळझाडांचे व्यवस्थापन उच्च तंत्रज्ञान वापरुन विद्यापीठ उद्यानांतर्गत करण्यात येत आहे.

# आस्था डेकेअर सेंटर

संचालक - डॉ. स्मिता अवचार

आस्था डे केअर सेंटरची सुरुवात दि. २७ जून २०१४ पासून करण्यात आलेली आहे. विद्यापीठातील शिक्षक, कर्मचारी व संशोधक विद्यार्थ्यांच्या पाल्यांसाठी हे केंद्र सुरु राहील. यामध्ये १ वर्षे ३ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. सध्या प्रवेशितांची संख्या १४ असून एकूण २० जणांना प्रवेश देण्याची व्यवस्था आहे. या केंद्रासाठी १ अधीक्षक, ३ आया व १ सफाई कर्मचारी असा स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमण्यात आलेला आहे. या केंद्रासाठी स्वतंत्र सल्लागार स्थापन करण्यात आली असून त्याचे सदस्य पुढीलप्रमाणे आहे.

१. डॉ. ए.एस. राजभोज    २. श्रीमती पुष्पा गायकवाड    ३. डॉ. सुनिता अंकुश

# आरोग्य केंद्र

दिनांक ०१/०७/२०१५ ते ३०/०६/२०१६ या कालावधीतील आरोग्य केद्राद्वारे केल्या गेलेले उल्लेखनीय कार्य खालीलप्रमाणे:

१) कर्मचाऱ्यांना सोईस्कर अशा आरोग्य केंद्राच्या वेळा : आरोग्य केंद्र सकाळी ०८:०० ते ११:३० आणि तसेच दुपारी ३.०० ते सायं ६.३० या वेळेत कार्यरत असते. त्यामुळे शहरातून येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयास येण्यापूर्वी व परतताना त्याचा लाभ घेता येतो. प्रत्येक शनिवारी सुद्धा आरोग्य केंद्र सकाळी कार्यरत आहे. शनिवारी व सोमवारी एखादी सार्वजनिक सुट्टी असल्यास सुद्धा आरोग्य केंद्र सकाळी कार्यरत ठेवले जाते व रुग्णांच्या औषधोपचारामध्ये नियमितपणा रहावा हे पाहिले जाते.

२) रुग्णसंख्या व औषधोपचार फी : दि. ०१/०७/२०१५ ते ३०/०६/२०१६ पर्यंत एकूण ४६२० रुग्णांनी आरोग्य केंद्राचा लाभ घेतला. या कालावधीत रुग्णाकडून एकूण रु.४३६६७/- रक्कम फी च्या स्वरुपात जमा झालेली आहे. आरोग्य केद्रातून रुग्णांना सर्व प्रकारची औषधी अगदी नामपात्र शुल्कात उपलब्ध होतात.

३) श्री गणपती नेत्रालय जालना यांच्या सहयोगाने दि.२०/०४/२०१७ रोजी मोफत नेत्र तपासणी शिबीराचे विद्यापीठ परिसरात आयोजन करण्यात आले. या शिबीरामध्ये १७५ विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची तपासणी करुण उपचार करण्यात आले. ३९ कर्मचाऱ्यांना नाममात्र शुल्कामध्ये चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

४) दि. ५ ते ९ नोव्हेंबर २०१६ दरम्यान विद्यापीठ परिसरात आयोजित 'इंद्रधनुष्य युवक महोत्सव' दरम्यान ६५ रुग्ण तपासून उपचार करण्यात आले व २४ तास आरोग्यसेवा देण्यात आली. तसेच १८ ते २३ नोव्हेंबर २०१६ दरम्यान विद्यापीठ परिसरात आयोजित 'इन्स्पायर सायन्स कॅम्प' मध्ये १० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

५) दि. १७/०१/२०१६ व दि. २८/०२/२०१६ रोजी पल्स पोलिओ अभियानांतर्गत आरोग्य केंद्र येथे विद्यापीठ परिसरातील ५ वर्षाखालील बालकांना पोलिओ डोस पाजण्यात आले.

६) दर महिन्याला विद्यापीठ परिसरातील कॅन्टीन व हॉस्टेल मेसची तपासणी आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्यातर्फे करण्यात येते. त्याचप्रमाणे तपासणी अहवाल योग्य त्या सुचनांसहित कुलसचिव कार्यालयास पाठविला जातो.

७) दंतचिकित्सक व महिला वैद्यकीय अधिकारी : विद्यापीठातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या उपचारासाठी दंतचिकित्सक तसेव विद्यार्थी व महिला रुग्णांच्या तपासणीसाठी महिला वैद्यकीय अधिकारीची सेवा सुद्धा उपलब्ध आहे.

८) शारिरीक शिक्षण अंदाले १०० खेळाडूंची वैद्यकीय तपासणी केली गेली. अशा प्रकारे आरोग्य केंद्राचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थी, विद्यार्थीनी, खेळाडू, शिक्षक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सहजपणे उपलब्ध होऊ या दृष्टीने आरोग्य केंद्र कार्यरत आहे.

## ''यंदाचे अर्थशास्त्राचे नोबेल : करार सिद्धांत''

(विद्यार्थी कल्याण विभाग, 'युवारंग साठी लेख)

डॉ.बेन्ट होल्मस्टम आणि डॉ. हार्ट यांना वर्षीचे अर्थशास्त्रातील नोबल जाहीर झाले आहे. त्यांनी मांडलेल्या करार सिद्धांताची चर्चा आपण या लेखातून करणार आहोत. अर्थशास्त्राचे जनक अडाम स्मित पासून अनेक अर्थ तज्ञ मालक आणि कामगार यांच्या ग्रंथात श्रमिक आणि भांडवलदार आहे व करत आहेत. कार्ल मार्क्स यांनी सुद्धा दास कॅपिटल या ग्रंथात श्रमिक आणि भांडवलदार यांच्यातिल संघर्षाचे विस्तृतपणे विश्लेषण केलेलं आहे. बामोल यांच्या मते कंपनी महसूल महत्तम करण्याचे उद्दिष्ट ठेवतात तर विल्यम्सन च्या मते कर्मचारी वेतन, भत्ते आणि इतर सोयी सुविधा प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवतात. याच परंपरेतील डॉ. बेन्ट होल्म्स्टम आणि डॉ. हार्ट हे त्यांच्या ''**कराराच्या सिद्धांतात**'' (Contract Theory) असे म्हणतात की कंपन्यांनी कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांच्या विस्तृत कामगिरीच्या मूल्य मापानाशी जोडले पाहिजेत. त्याच बरोबर त्यांनी करारातील मिश्र वेतन आणि प्रोत्साहने यातून कर्मचार्यांना मिळणाऱ्या लाभावर लक्ष केंद्रित केले आहे. या द्वय अर्थ शास्त्रज्ञांनी सलग ३० वर्षापेक्षा जास्त काळ अभ्यास करुन विविध संशोधन पेपर, पुस्तके, नियतकालिके, व्याख्याने, यांच्या माध्यमातून कराराचा सिद्धांत विकसित केला आहे.

प्रश्न हा आहे की आपल्य कराराची गरजच का भासते ? या प्रश्नाची उकल करण्याचा प्रामाणिक प्रयत्न या दोन उभय अर्थतज्ञांनी केला आहे. करार हा मुख्यत्वे दोन घटकांमध्ये किंवा पक्षामध्ये होत असतो असे की मालक आणि कामगार यांच्यातील करार, कंपन्या आणि त्यांचे ग्राहक यांच्यातील करार इत्यादी. करार केल्यामुळे दीर्घकालीन उद्दिष्टांमध्ये स्थैर्य प्राप्त केल्या जाऊ शकते. करार हे लेखी आणि अलेखी स्वरुपाचे असतात त्याचबरोबर औपचारिक आणि अनौपचारिक करार असेही वर्गीकरण केल्या जाते. डॉ.होल्मस्टम यांच्या अभ्यासाचा रोजगार करार हा विषय आहे तर डॉ. हार्ट यांनी कंत्राटी संबंधाच्या कराराचे विश्लेषण केले आहे. यांच्या मते करार हे कायद्यासनुसार किंवा सामाजिक संकेतानुसार केले जातात. अर्थव्यवस्था आणि बाजार यंत्रणा केवळ विश्वासावर कार्य करित नाहीत तर त्यासाठी कायदेशीर पाठिंब्याची गरज असते. करारामुळे संबंधित घटक दीर्घकाळ एकत्र काम करण्याची शाश्वती निर्माण होते आणि संभावित धोके विभाजित करुन कमी करण्यात येतात. करारातील नियमाद्वारे दोन्ही घटकांची उद्दिष्ट आणि हितसंबंध जोपासणे अपेक्षित असते. करार करतांना करार करणाऱ्या घटकांमध्ये किंवा पक्षामध्ये माहितीचे असंतुलन असू शकते जसे की करारातील एका पक्षास दुसऱ्या पक्षापेक्षा कमी किंवा अधिक माहिती असणे, म्हणजेच माहितीचे असंतुलन होय, माहितीचे असंतुलन करारीतील / कंत्राटातील दोन्ही घटकांवर परिणाम करत असते. करारामध्ये ज्या पक्षास अधिक माहिती असेल तो अनुकूल पक्षाची निवड करारासाठी करत असतो तेंव्हा तो करार फायदेशीर ठरतो. करारातील फायदेशीर घटकांना अनुकूल तर अफयादेशीर घटकांना प्रतिकूल घटक असे म्हणतात.

त्यांच्या मते कंत्राट हे मालकीच्या हक्कापेक्षा सोयीस्कर ठरते. काही गंभीर समस्यांची आव्हाने करार किंवा

कान्त्राटाद्वारे पेलल्या जाऊ शकतात. जसे शहरासतील कचरा व्यवस्थापनाचे आउटसोर्सिंग फायद्याचे ठरते. परंतु सर्वच गोष्टींमध्ये करार फायदेशीर ठरेलच असे म्हणणे योग्य होणार नाही आणि तसे अमलातही आणता येणार नाही. उदा. सरकारने परराष्ट्र धोरण राबविण्याचे कंत्राट किंवा करार खाजगी कंपनीशी करणे म्हणजे निव्वळ वेडेपणा ठरेल. यातून हित सध्या होण्याऐवजी अहित होण्याची शक्यता जास्त आहे. त्यांच्या मते करार हा नेहमी हिताचाच असावा.

या सिद्धांतामध्ये करारातील आर्थिक आणि अर्ठीकत्तर प्रश्नांची अकल अतिशय काळजीपूर्वक करण्यात आलेली आहे. त्यांच्या मते करार हे अतिशय सोपे असतात पवरंतु करारामध्ये सहभागी झालेले पक्ष त्यांच्या पूर्ण अपेक्षा  तपशिलाने नमूद करत नाहीत त्यामुळे करार मधेच थांबवावे किंवा तोडावे लागतात, उदा. काही कंपन्या करार करत असतांना नियम पुस्तीकेत त्यांच्या पूर्ण अपेक्षा व्यवस्थित नमूद करत नाहीत त्यामुळे कामकाज प्रक्रिया विनाकारण क्लिष्ट होते. तुलनेने विकसित देश विकसनशील आणि तिसऱ्या जगातील देशापेक्षा करार संदर्भात अधिक सजक असतात. असे प्रस्तुत संशोधनातून समोर आले आहे.

**लेखकः दत्तात्रय शिवाजी गायकवाड (एमफिल)**
मु.पो.देऊळगाव कोळ, ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा
मो.८३०८४१६६०९
अर्थशास्त्र विभाग, डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद

# ''शेतकऱ्यांना कायम कर्जमूक्ती मिळविण्यासाठी शाश्वत शेतीचा आधार''

**डॉ. विलास स. इप्पर**
कार्यक्रम अधिकारी
सह. प्राध्यापक, वाणिज्य विभाग
डॉ.बा. आं.म.वि.औरंगाबाद

**प्रस्तावना :**

शाश्वत शेती व शेतीत शाश्वत व कायम उपाय योजनाच्या आधारे शेतकऱ्यांच कर्जबाजारीपणा वर कायमस्वरुपी उपाय करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडवणीस यांनी भर दिला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी संपुर्ण शेतकरी आणि तथाकथीत शेतकऱ्यांचे कैवारी रस्त्यावर उतरले असताना शाश्वत शेती व शेतीत सुधारणा ह्या स्वागताहार्य आहेत. परंतू- उपासीपोटी कोणतेही काम एखाद्या मजदूर कामगार करु शकत नाही म्हणजे आज शेतकरी कर्जबाजारी झाला व तो या कर्जाच्या विखळ्यात वेळोवेळी साप त्यावर कायम स्वरूपी उपाय हा मा. मुख्यमंत्र्याच्या दृष्टीकोणातून विचार केल्यास महत्वाचा आहेत आणि या धोरणाला कल्पनेला योग्य अंमलबजावणी शेतकऱ्यांची, शासकीय अधिकाऱ्यांची साथ मिळाली तर नक्कीच कायम स्वरुपी शाश्वत मार्ग निघेल अशा करावीच लागेल मात्र तुर्त तरी शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन चालुवर्षातील उत्पादनासाठी शेतकऱ्याला साथ देण्याची जबाबदारी ही मा.मुख्यमंत्र्याची आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था आहे.ती शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था आहे ७०टक्के लोकसंख्या ही आजही ग्रामीण भागात राहते ६० टक्के लोकांना रोजगार पुरविण्याचे कार्य शेती करते परंतु शेती क्षेत्रात अनेक समस्या व आव्हाने आहेत. महाराष्ट्रामध्ये सिंचनाची सर्वात मोठी समस्या आहे. एकूण भारत ४१ टक्के कृषीक्षेत्र सिंचणाखाली आहे. तर महाराष्ट्रातील हे प्रमाण फक्त १७ टक्के आहे मराठवाड्यात केवळ ४ टक्के तर विदर्भात हे प्रमाण ११ टक्के आहे यावरुन असे लक्षात येते की केवळ सिंचना अभावी मराठवाडा आणि विदर्भातील कृषीक्षेत्रात समस्येचे मुळ कारण हेच आहे आणि ह्याच भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या दहा वर्षापासून होताना दिसत आहे.

या भागतील शेतकरी कर्जबाजारीपणा मुळेच आत्महत्या करत आहे असे अनेक संशोधन अवहालातून व अभ्यासातून सिद्ध झालेले आहे. परिणामी शासनानी विविध योजना तसेच कर्जमाफीच्या माध्यमातून ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु कर्जमाफी हा काही यावर कायम उपाय नाही हेही आता सिद्ध झालेले आहे त्यामुळे या समस्यावर शाश्वत किंवा कायम स्वरुपी उपाय करणे आता महत्वाचे झालेले आहे.

नुकतेच भारतातील उत्तरप्रदेश योगी अदित्यनाथ सरकारने २१५.०० शेतकऱ्यांचे एक लाख रुपायापर्यंतचे ३६०००

कोटी कर्ज माफीची घोषणा केली (७ एप्रिल २०१७) तसेच तामिळनाडू राज्यात देखील आदेशानुसार कर्जमाफी देण्यात आली आहे. असून ह्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सुलभ कर्जमाफी करावी लागेल किंवा मा.देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देतील. परंतु त्याही अगोदर मा.मुख्यमंत्र्यांचा भर हा या समस्यावर कायमस्वरुपी उपाय शोधण्यासाठी आहे असे त्यांच्या भुमिकेतून दिसते, त्यामुळे त्यांच्या वक्तव्यातून ''कर्जमाफी पेक्षा गुंतवणुकीला प्राधान्य'' दिसते. त्यांचे हे धोरण किंवा मत अत्यंत स्वागताहार्य आहे. आणि याचा परिणाम निश्चितच योग्य काळात महाराष्ट्रात दिसेल म्हणजे सरकारकडून आर्थीक तरतुदीच्या माध्यमातून झालेली गुंतवणूक आणि क्षेत्रफळ चांगले किंवा शास्वत शेतीचे फळ मिळतील फक्त या सर्व धोरणाची संकल्पना योग्य अंमलबजावणी झाली पाहिजे. परंतु आजच्या घडीला मात्र भविष्यकालीन उपाय योजनेवर सरकार विश्वास ठेवून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आजतरी वाऱ्यावर सोडता येणार नाही. कारण नूकताच मागच्या व त्याही मागच्या वर्षी महाराष्ट्राने विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात भीषण अशा दुष्काळाचा सामना केलेला आहे. त्यामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत सापडला आहे. कर्जबाजारी झाला आहे. आणि वर्चेवर शेतकरी समुदायातून आत्महत्या होताना दिसत आहेत. आज तरी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यानी शेतकऱ्यांला कर्जातून मुक्तता द्यावी. कर्ज माफ करावे आणि यावर कायम स्वरुपी उपाय काढण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. शेतकरी बांधवाने आता स्वतः जागरूत होऊ लोकसहभागातून कायम शाश्वत स्वरुपाचे बदल सुधारणा ग्रामीण भागात करुन जलसिंचनाची सोय केली पाहिजे. शेतकऱ्यांनी संघटित होऊन अभ्यासाचा, व्यवसायाचा अमलंब करुन स्वतः:चा, शेतीचा विकास केला पाहिजे.

**'उन्नत शेती समृद्ध शेतकरी'**

या अभियानातंर्गत महाराष्ट्राचे कृषीमंत्री मा.पांडुरंग फुंडकर यांच्या हस्ते माहितीपत्रकाचे शेगाव जि.बुलढाणा येथे उदघाटन झाले. परंपरागत शेतीमधून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी ''उन्नत शेती -समृद्ध शेतकरी'' हे अभियान देखील मा.मुख्यमंत्र्याच्या धोरणाचाच एक भाग आहे. या माध्यमातून शेतकऱ्याची उन्नती साधण्याचे काम होईल यात कृषी विभागातील प्रत्येक कर्मचाऱ्याची जबाबादरी राहणार आहे. शेतकरी सध्या जे धान्य घेतो पिकवतो मात्र तो भाव ठरवत नाही. शेतकऱ्यांची आतापर्यंत सर्वानीच लुट केली असे स्वतः मंत्री महोदय मान्य करतात. त्यामुळे शेतकऱ्याला सन्मानाने उभे राहण्याचे धोरण माननीय मुख्यमंत्र्याचे आहे. यात तीळमात्रही शंका घेण्याचे कारण नाही. मा.फुंडकर कृषीमंत्री मान्य करतात, की आतापर्यंत शेतकऱ्यांची सर्वांनी लूट केली आहे. परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाला. महाराष्ट्र शासनाने शाश्वत व कायम स्वरूपी यावर पाऊल उचलने हे अत्यंत महत्त्वाचे तर आहेच पण आज घडीला एप्रिल मे.जून मध्ये नवीन पेरणी हंगाम सुरु होईल शेतकरी बांधवावर आधिच कर्जाचा बोजा आहेच एकदा हे कर्जाचे ओझे कमी करणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

**''संकल्प शाश्वत शेतीचा''**

गेल्या कित्येक वर्षात शेतीक्षेत्रात भरावे गुंतवणुक झाली नाही शेतीक्षेत्र मागास राहण्याचे हे सर्वात महत्वाचे कारण आहे ही परिस्थिती आता मा.मुख्यमंत्री व सामान्य सर्व शेतकऱ्यांना आता कळून चुकली आहे. या अधिच्या आतापर्यंतच्या

सरकारने मदत आणि पुनर्वसन येवढयापुरतच कार्य केलेले आहे तथापी ७०टकके किंवा मोठी लोकसंख्या अवलंबून असलेल्या या क्षेत्राचा विकास होऊ शकला नाही. महाराष्ट्रात ८३ टक्के कृषी क्षेत्र (सरासरी) कोरडवाहु आहे पुर्णत: निसर्गावर अवलंबून असल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणामुळे महाराष्ट्रात विशेषत: मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना सतत दुष्काळाचा सामना करावा लागतो. कधी पावसा-अभावी तर कधी अतीवृष्टीमुळे दुबार पेरणी करावी लागते, वन्यजातींचा, निळगायी, राणडुक्कर, हरीण इ. प्राण्याचा उपहत तर फरच पिकाची नासाडी करतात. या प्रमाणे शेतीवर आसमानी म्हणजे नैसर्गीक संकटे येत राहतात. त्यामुळे कृषी व्यवसाय हा देशभराचा बनला व सतत बनतचालला आहे. परिणामी शेतकरी कर्जबाजारी बनला आहे.

या वरील समस्येवर मात करण्यासाठी शेतीला पाणी मिळण्यासाठी निश्चित सरकार पाऊल उचलत आहे. त्यातलाच एक भाग म्हणजे ''जलयुक्त शिवर'' राज्यात जनतेच्या व सरकाराच्या मर्जीने ही योजना यशस्वी झाली होती परंतु नंतरच्या काळात मात्र परत या योजनेची गती मंदावली व अयशस्वी होताना दिसत आहे.

**भांडवली गुंतवणुकीला प्राधान्य**

आजच्या घडीला महाराष्ट्रातील शेतकऱ्यावर थकीत कर्ज हे दोन्ही हंगामातील मिळून ३०२१६ कोटीचे आहे. तथापी वर्चेवर शेतकरी कर्जबाजारी होतो सरकार अधून मधून कर्ज माफ करते काही लोकांच्या तथाकथीत तज्ञांच्या मते शेतकऱ्यांना कर्ज घेण्याची व ते कर्ज न परत करण्याची सवय लागली म्हणतात कर्ज माफी केल्याने कर्ज बुडविण्याची संस्कृती वाढेल शेतकरी वारंवार कर्ज बाजारी होतो असे होऊ नये शेतकऱ्यांचे उत्पादन, अथवा वाढावा शाश्वत स्वरुपाचा विकास व्हावा यासाठी सध्याच्या सरकारचे पाऊल उचलण्यास सुरु केले तथापि राज्यात कृषी क्षेत्रात गुंतवणुक वाढविल्यावर भर देण्यासाठी ३१००० कोटीची भांडवल गुंतवणूक करण्यात आली (गेल्यावर्षी) त्यापैकी शेती क्षेत्रात १९००० कोटी गुंतवणुक केली. त्याची कडे यो वाजत दिसतो व दिसतही आहेत उणेचार शेमीच विधसदर १२ टक्के वर पोहचला जर हे गुंतवणूकीतही सातत्य राहीले तर पाणी, वीज याचा पूरवठा होईल शाश्वत स्वरूपात कृषी क्षेत्राला विकास होईल या वर्षात (२०१७-१८) २२ हजार कोटची गूंतवणूक केली जाईल यामध्ये साठवणूकीसाठी ते शेतीमालाला बाजारपेठेपर्यंत जोडण्याचा घटकांचा समावेश आहे.

बाजार पेठेतील तुलना करणे आवश्यक आहे शेतकऱ्याला त्याच्या मालाचा बाजार भाव ठरविण्याचा अधिकार नाही. तथापी शेतकरी ते ग्राहक चांगली दलालाची मध्यस्थांची साखळी नष्ट केल्यास शेती मालास योग्य भाव मिळेल.

प्रक्रिया उद्योगाला चालना दिल्यास शेतीमाल यांच्या ग्राहकापर्यंत दिल्यास शेतकऱ्याचे उत्पन वाढेल ज्याप्रमाणे उसाला हमीभाव मिळतो. तसे हमीभाव प्रत्येक पिकाला मिळाला पाहिजे. त्यासाठी १७ ते १८ फळावर प्रक्रिया करणारे प्रकल्प विदर्भ आणि मराठवाडा विभागात उभारले जाणार आहेत.अमरावती येथे टेक्सटाईल पार्कची उभारणी सुरु आहे. कापूस या पिकाला मिळण्यासाठी सूतापासून ते कापड आणि फॅशनपर्यंत हे सर्व पार्कमध्ये केले जाणार आहे. विदर्भ आणि मराठवाडातील ११

जिल्ह्यात हे टेक्सटाईल पार्क भारले जातील.

### हवामान अनुकूल कृषी प्रकल्प

उत्पादकता हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे महाराष्ट्रातील शेतीची ही एक समस्या आहे. उदा. कापसाच्या उत्पादक क्षेमतेत महाराष्ट्र, गुजरातपेक्षा कितीतरी मागे आहे. त्यामुळे हमीभाव आपल्याला परवडत नाही. ४० टक्के क्षेत्र हे कोरडवाहु आहे तथापी महाराष्ट्रातील सिंचनवाढ होण्यासाठी प्रयत्न होण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जागतीक बँकेच्या मदतीने ''नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना'' हवामान अनूकूल कृषी प्रकल्प राबविला जात आहे. प्रथमच जागतीक बँकेच्या मदतीने विदर्भ आणि मराठवाड्यातील ५००० गावातील शेती सुधारणेसाठी ७००० कोटीची गुंतवणुक केली जाणार आहे. माती, पाणी, पीक पद्धती ते काढणीनंतरच्या तंत्रज्ञानापर्यंत साऱ्या घटकांचा या प्रकल्पात समावेश आहे.

### गुंतवणुकीचाच पॅटर्न

भविष्यकाळात शाश्वत स्वरुपात शेती क्षेत्रात अमूलाग्रह बदल करण्यावर या सरकारचा भर आहे हे स्वागतशील आहेच आधिच्या सरकारने मदत आणि पुर्नवसनासाठी मदत केली पण त्या नंतर ही शेतकरी कर्ज बाजारी होताना दिसला या सरकारच्या कल्पक धोरणाचा एक भाग म्हणजे गुंतवणुकीवर भर देऊन कायम स्वरुपी उपाय योजण्यावर भर देण्याचा प्रयत्न होत आहे.

अनेक कारणांनी शेतकरी कर्जात सापडत असाला तरी सिंचनाचा अभाव, बाजारपेटेतील कर्जाचा वेळेत न होणारा पूरवठा, खाजगी सावकारांचा प्रभाव, व वाढता का खर्च हे मूख्य कारणे कर्जबाजारी महाराष्ट्रात एक कोटी ३६ लाख खातेदार आहेत. त्यापैकी ३१ लाख शेतकरी आता थकबाकीदार आहेत. आणि या शेतकऱ्यांची पत कमी होणार बँकींग व्यवस्थेचा बाहेर पडण्याचे धोरण आहे. हे चित्र वेळोवेळी निर्माण होते. कर्जमाफी हा एक तात्पुरता उपाय आहे. हे आला आता सर्वांना कळून चूकले आहे. उदा. सन.२००९ मध्ये ज्यांना कर्जमाफ केले ते २०१० मध्ये पुन्हा कर्जबाजारी झाले. म्हणजेच शाश्वत स्वरुपात उपाय हे करावेच लागतील त्यामुळे आशा आणि सरकारवर विश्वास ठेवावाच लागेल आज कर्ज माफी दिली तर सरकारला वाटते गुंतवणूकीसाठी पैसा राहणार नाही पण त्या हंगामात शेतकऱ्यांना शेतीसाठी पैसा उपलब्ध होणे ही कठीण होईल तथापि शेतकरी परत अडचणीत सापडेल.

शेतकऱ्यांसाठी आखलेल्या योजना त्यांच्यापर्यंत निट पोहचत नाहीत, गैरवापर होतात. भविष्यात हे टाळण्यसाठी सरकारने या योजणांचा लाभ निधी थेट शेतकऱ्यांचा खात्यावर जमा करण्याचा हा निर्णय स्वागताहार्य आहे त्यामूळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. त्याच प्रमाणे शाश्वत शेती, अर्थात शेती व्यवसाय सुधारण्यासाठी कायम स्वरुपातील उपाय योजना अत्यंत महत्वाची आहे हे ध्यानात घ्यावे लागेल.

**शाश्वत शेती व्यवसायासाठी पूढील गोष्टीवर भर :-**

१) लोक सहभागातून जलयूक्त शिवर, जलसिंचन जल साक्षरता कार्य झाली त्याची गती वाढवावी लगेल या ''जल युक्त'' उपक्रमाची ठेकेदारी बंद केली पाहिजे. या चांगले काम होत असतांना कर्तृत्वान मंत्र्याकडून ते खाते वाढून घेतात परत आणि ठेकेदारीचा प्रवेश करुण कामाची गती मात्र.

२) अर्धवट बांधकाम झालेले पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यावर भर देण्यासाठी केंद्राकडून मिळालेला २६ हजार कोटी निधी वापस सर्व प्रकल्प पूर्ण झाले तर शेतीला पाणी पूरवठा होईल

३) शहरातील ग्राहकापर्यंत शेतीमाल थेट पोहचण्यास शहरात सरकारी व महानगरपालिकेचा जागावर शेतकरी बाजार भरला पाहिजे त्यामुळे दलालाची साखळी नष्ट होईल शेतकऱ्यांच्या मुलांना किरकोळ व्यापार बाजारपेठ इ. प्रशिक्षण देऊन ग्राहकापर्यंत शेतीमाल व भाजीमाल पोहचविण्याचे प्रात्यक्षीक व प्रशिक्षण दिले पाहिजे यामध्ये गट निर्माण करुन श्रमविभागणी केली तर ते शक्य आहे.

४) शेतीला कायम स्वरुपी विजपूरवठा झाला पाहिजे लोडशेडींगमूळे रात्री बे रात्री शेतकऱ्यांना विजे अभावी आपला जीव धोक्यात घालावा लागतो. रात्रीच्या वेळी कित्येक शेतकरी साप चावून मृत्यु मरण पडले

५) सूक्ष्म सिंचन सक्तीचे केले पाहिजे सरकारही त्यासाठी अत्यंत अल्पदरात किंवा अनुदान स्वरुप सिंचन संच शेतकऱ्यांना दिले पाहिजे परंतू दोन वर्ष सिंचन अनुदान किंवा संपुर्नसोयी शेतकऱ्यांना मिळत नाही हे वास्तव आहे.

येत्या काळात वरील प्रमाणे साक्षर शाश्वत स्वजातील शेती कारण्यासाठी दिल्या विकास करण्साठी प्रयत्न करत आहे. व मात्र शेतकऱ्यांच्या मुलांनी याचा सकारात्मक अभ्यास करुन सहभाग घेऊन लोकसहभाग वाढविला तर नक्कीच येत्या काळात कृषीक्षेत्रात सुधारणा होईल. शेतकरी कर्जातून मुक्त तर होईलच तो सुजलाम सुफलामप होईल यात शंका नाही आणि आपण म्हणू शेतकरी कृषी क्षेत्रात शाश्वत स्वरुपात बदल झाले.

## ''शांति तथा सद्‌भावना के गठन में धर्म की भूमिका''

''जहा डाल डाल पर सोने की,
चिडीयाँ करती है बसेरा,
वह भारत देश है मेरा
जहा सत्य, अहिसा और धर्म का,
पगपग लगता है डैरा
वह भारत देश है मेरा ''

शांति तथा सद्‌भावना इन दोंनो को मिलाकर ही उनके गठन में धर्म किस प्रकार से अपनी भूमिका बजाता है । धर्म तो कई सारे है और जहाँ तक भारत देश का विचार करते तो हिंदु, मुस्लिम, ईसाइ, सीख, बौध्द ऐसे कही सारे धर्म है । कौनसा ही धर्म हो सभी धर्म में अलग-अलग देवता को मानते है उनकी पूजा करते है लेकिन सभी अपने - अपने तरिके से उनकी पूजा प्रार्थना करते है । देखा जाए तो सभी के लिए एकही रोशनी देनेवाला सुरज उगता है । एक ही चाँद है जो रात के अंधकार को मिटाकर प्रकाश निर्माण करता है । इस तरह धर्म चाहे जो भी हो लेकिन सभी समान है । जिस प्रकार सुरज सभी को प्रकाश समान तरिके से देता है कोई भेद-भवना नही करता । कौन गरिब, कौन अमिर यह नही देखता तो फिर हम कौन होते है इस समाज में भेद-भाव करने वाले । और यही सिख हमें अमारे धर्म से मिलती है ।

अगर सोचेंगे तो महात्मा गांधीजी ने सभी अहिंसा और शांति सेही समाज में उनका कार्य किया है । सभी को साथ में लेकर उन्होंने सद्‌भावना से यह कार्य किया । उन्होंने सभी को बताया की हिंसा करना यह बुरी बात है । अगर हमें समाज में कुछ परिवर्तन लाना ही होगा तो वह अहिंसा और शांति इन दो तत्वों को हमारे जीवन में लाना होगा । तभी यह संभव है । कोई बात अगर झगडा करने से सुलझ नही सकती उसके विपरित परिणाम होंगे समाज में एक - दुसरे के प्रति द्रेश, राग खडा हो जाऐगा । उन्होंने अहिंसा और सत्य यह दोंनो मार्ग खुद आपने जीवन में लाऐ और फिर दुसरों को उन्होंने यह बताया और यह दो शब्द उन्होंने गीता में से उठाऐ है । यह गीता जैसा महान ग्रंथ जो मानव को जीवन कैसा जिना है य समझाता है ।

उसी प्रकार जीवन में शांती तो होनी चाहिऐ लेकिन उसके साथ ही सद्‌भावना भी जरुरी है । सद् यानिके अच्छा, सच्चा, शुध्द और भावना यानिके दुसरो के प्रति अच्छा सोचना उसके बारे में हमारे मन में अच्छा विचार लाना । उसके बारे में अच्छा सोचना । लेकिन आज कल तो यह सब विचार किधर भी नही दिखाई देते । अरे ... किसीका अच्छा तो दूर की बात यहा तो कोई किसी को ठिक तरह से पुछता भी नही और कौन किसके बारे में अच्छा सोचेंगां ।

अगर हम हमारे पुराने जमाने की बात करे तो हमे बहु कुछ उनसे सिकने जैसा मिलता है । जैसे पुराने जमाने में विद्यार्थीयों को पढाने के लिए आश्रम भेजते थे । क्योंकि उन्हे हमारी संस्कृती, धर्म का ज्ञान प्राप्त हो । आश्रम में रहने वाला विद्यार्थी  जिसे शिष्य कहते है । वह शिष्य अपने माँ - बाप से दूर रहता था । अपने गुरुजी से शिक्षा प्राप्त करता था । उधर ही वही सभी ज्ञाप प्राप्त करता था । सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक उसके साथ ही माता-पिता के संस्कार, उनके प्रति कृतज्ञता ऐसे गुणों को जीवन में कैसे फुलाना है वह सभी आश्रम में गुरु से ही प्राप्त करते थे । जैसे फुलाना है वह सभी आश्रम में गुरु से ही प्राप्त करते थे । जैसे हमे मालून है की गुरु द्रौणाचार्य और एकलव्य की कहाणी । गुरु ने मना किया था उन्हे

धर्नुरविद्या सिखाने के लिए क्योंकि वह क्षत्रिय थे फिर भी एकलव्य हार न मानी उन्होंने गुरु द्रौणाचार्य का मिट्टीका पुतला बनाकर उसीसे यह धर्नुरविद्या का ज्ञान संपादित किया था। और बाद में उन्हें गुरुदक्षिणा के स्वरुप अपने डाए हाथ का अँगुठा दिया था।

इस प्रकार हमारे भारतीय संस्कृती में ऐसे महान गुरु-शिष्य के चरित्र से हमें बहुत सिकने को मिलता है।

इससे समाज में जो तरुण वर्ग है व योग्य मार्ग पर चलता था। सभी तरुण सुशिक्षित और सुसंस्कारी बनते थे। इसका परिणाम देश की नही पिढी सुयोग बनती थी। सभी एक-दुसरे की साहय्यता करते थे सभी के साथ अपना दुःख बाँटते थे उनके सुख और दुःख में मिलझुल कर रहते थे। इस से एक - दुसरे के प्रति आदर भाव बढता था। और कहा जाता है ना जो दुसरो के बारे में अच्छा सोचेंगा तो खुद के बारे में भी अच्छा ही होगा। और यह सभी अच्छी बाते हमे हमारे अपने - अपने धर्म से ही सिकने को मितली है।

हमारे देश में अनेक विविध धर्म, जात, वंश, परंपरा, संस्कृती दिखाई देती है सभी अपने-अपने तरिके से जीवन चलाते है। सभी की अपनी - अपनी अलग भाषा है। सभी अपने समुदाय में मिलझुल कर रहते है। लेकिन चाहे विविधता हो परंतु हमारी संस्कृती हमें विविधता में एकता सिकाती है यह हमारी विशेषता है। हम भारतीय एक है यह हमें दिखाई देता है। हम सबको एक - दुसरे के प्रति आद है। दुसरा - दुसरा न होकर वह मेरा भाई है यही समझ हमें अपने धर्म से मिलती है। और सभी धर्म हमे यही सिकाते है।

सभी धर्म में हमें अलग-अलग तरिके से कुछ ना-कुछ सिखने को मिलता है। जैसे हिंदु मे लोग मंदिर मे जाते है, तो खिचन चर्च मे जाते है, मुस्लिम मज्जित मे जाते है, तो सीख गुरुद्वारा जाते है। सभी अपने तरिके से भगवान को मानते है और उधर हमे शांतता तो देखने मिलती है साथ ही सभी को एक-दुसरे के प्रति आदर भाव, प्रेम, एकात्मा और उसके साथ ही सद्‌भावना भी दिखाई देती है।

छत्रपती शिवाजी महाराज, येशु ख्रिस्त हो, या खुदा हो सभी ने अपने धर्म से सभी को एक विशिष्ट प्रकार की शिक्षा (ज्ञान) दिया है। सभी को धर्म क्या है यह बताया है हम बोलते है धर्म किन क्या है यह धर्म ? हम सोचते है? मंदिर में जाना भगवान को फुल, नारल, चढाणा यह है धर्म ? या फिर चर्च में जाना यह है धर्म ? या तो बायबल, कुराण, सिर्फ यह पढना है धर्म ? मुझे लगता है की हम इनको ही मर्ध समझते है। परंतु कभी सोचा है हमारा खुद का एक धर्म है मानव होने का। उसके आगे जाकर हमारे माता-पिता के प्रति प्रेम, आदर, कृतज्ञता यह गुण जीवन में लाना यह है धर्म, भाई होने का धर्म, बहन होने का धर्म, ऐसे और कही सारे कितने धर्म है लेहिन हम उनको मानते ही नही।.

हम तो आँखों में जैसी पट्टी बंधी हो उस अंधकार को ही धर्म समझ बैठे है। और जैसा चल रहा है उसी के साथ चलते जा रहे है। हम कभी सोचते ही नही की हमारे धर्म में क्या सिखाया अगर कौनसी बात होगी तो वह वैसी क्यु है उसके पिढे का रहस्य, उसके पिछे की वजहा माजूम ही नही करते।

हमे तो यही मालूम है की इस देश में अलग धर्म, जातीया है। अलग-अलग भाषा बोलने वाले हिंदी, गुजराती, मराठी ऐसी भाषा बोलने वाले लोग रहते है। लेकिन उनकी प्रत्येक की कुछ विशेषता है। हमारे घर में ही देखो हम सभी एकता से रहते है सभी को आदर देना उनको बाते मानना। ऐसा ही हमारा देश है अलग-अलग परिवार रहते है यह संकल्पना दिमाग में बैठ गई तो हम सभी के साथ मिलकर रहेंगे तो अपने आप सद्‌भावना निर्माण हो जाऐंगी। यह सब शांति और सद्‌भावना के गढन से ही होगा उसमें धर्म यह महत्व पुर्ण और आवश्यक तरिके से अपनी भूमिका पार पाडता है।

इस भार भूमि में ऐसे-ऐसे महापुरुषोंने जन्मलिया है की उनके जन्मसे यह सभी भूमि पवित्र और पावन हो गई है। राम, कृष्ण, हो या नौसो निन्यनवे (९९९) बार प्रयोग करने के बाद एक प्रयोग सफल हुआ ऐसे थॉमस एडिसन जैसे थोर वैज्ञानिक हो, महात्माजोतीबा फुले, शाहू, आंबेडकर जैसे समाज सुधारक और अपने जीवन का क्षणिक विचार न करते फांसी पर चढने वाले ऐस भगतसिंग, राजगुरु और सुखदेव ऐसे महान हुतात्मे यह सभी के विचारों से उनके जीवन परित्र से हमें कितना कुछ मिला है य सोच भी नही सकते।

जहा जन्में हो ऐसे महापुरुष
उस देश में क्या कमी हो।
ऐसे एक-एक रत्न जन्में
जिनका कोई मोल नही हो।

तो फिर सोचो मेरे देश के वासियों (लोगों) हम क्यु नही रह सकते शांति के साथ, क्यु नही रह सकते सद्‌भावना से। इस देश के सभी लोग मेरे बंधु है यह सिर्फ बोलने से नही चलेंगा अब कुछ करना होगा जब कुछ करेंगे तो ही वह बात आगे बढेंगी और वह हम सभी को मिलकर करना है। और वह हमारे जैसे नवयुवक ही कर सकते है और वह शांती से ही संभव है। इसमें धर्म की बहुत बढी भूमिका है।

''चलो युवाओं आज कुछ नया करें
शांती का हवज हाथों में लिऐ
मन में एक-दुसरे के प्रति
प्यार और सद्‌भावना लेकर
चलो युवाओ आज कुछ नाया करे।''



**कोमल सदाशिव हिरडे**
बी.ए.प्रथम वर्ष
शिवछत्रपती महाविद्यालय एन-३
सिडको औरंगाबाद

## शिक्षक

शिक्षक असतो ज्ञानाचा मार्ग
जो विद्यार्थ्यांना मार्ग दाखवितो,
व त्या मार्गाने चालायला शिकवतो.

शिक्षक असतो कारागीर
असा कारागीर जो दगडाप्रमाणे
विद्यार्थ्यांना घडवत असतो
व त्या विद्यार्थ्याला एक चांगला आकार देतो.

शिक्षक असतो मायेचा पद
असा पदर की विद्यार्थ्यांच्या पदरात ज्ञान पडते.

शिक्षक असतो चांगला मित्र
असा मित्र चूक झाली तर
मैत्री कधीही न सोडणारा.

**सविता एम.जाधव (नंन्नारे)**
मातोश्री जिजाऊ विद्यार्थीनी वसतिगृह क्र.२
पद-सहाय्यक



## गुरू वंदना (कविता)

तुम्ही सर मी विद्यार्थी ॥ धृ ॥
गुरूजी तुम्हा कसा विसरू

नऊ महिने केला अभ्यास ॥ १ ॥
झाले परीक्षेत पास

सरांनी दिली पाठीवर थाप ॥ २ ॥
आला विश्वास हृदयात

कोरा कागद काळी शाई ॥ ३ ॥
कुठवर रंग भरू

रामेश्वर म्हणे विष्णूदास ॥ ४ ॥
देवाला गुरूच्या हृदयात शोधा

तेव्हाच देव भेटे लवकर ॥ ५ ॥
म्हणून लागा अभ्यासाच्या मांग

कुठवरी अभ्यास करू ॥ ६ ॥
तुम्हा मी कसा विसरू

कवी

**राजेश्वर किसन खुडे**
वर्ग- M.A.I Economic
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद
मो. ९१५८०४१९५

# मला मंजूर आहे

मला सर्व काही मंजूर आहे
तू जिंकण्यासाठी, माझ हरणं

तुझ्या सुखासाठी माझ दुखणं

तुझ्या इच्छेसाठी तुला सोडणं

वेळ आलीच तर तुझ्यासाठी मरण
पण मला एक मंजूर नाही ते म्हणजे
तु मला विसरणं
आणि मला ते शक्य नाही

मी तुला विसरणं
२
किसी की अच्छाई का
इतना फायदा न उठाये
कि वो बुरा बनने के लिए
मजबूर हो जाये ।
याद रहे कि 'बुरा' हमेशा
वही बनता है जो
पहले 'अच्छा' है बनकर
टूट चुका होता है

# आयुष्य

आयुष्य असते एक देणगी,
जी परमेश्वराने आपल्याला दिलेली असते,

आयुष्य असतं एक गणित,
जे सोबत कुणी नसतांनाही आपल्याला सोडवाव लागत,
एकट्यानेच ते फुलवत रहावं लागत ॥.

आयुष्य खुप सुंदर आहे,
फुलाच्या कळी सारखं
अशी कळी की, जी उमलून फुल बनणारी,

आयुष्य असतं एक सुंदर जीवनाचा प्रवास
असा प्रवास की जो आपल्याला समाजात वावरुन
करायचा असतो.
आयुष्य असतं एक समाज

असा समाज ज्या समाजात विविध माणसे,
की पारखायला आपण शिकत असतो.

म्हणुन म्हणतो, आयुष्य एक आकार आहे,
असा आकार एकदा जर दिला तर तो,

मोडत नाही आणि मिटतही नाही,
त्यालाच तर आयुष्य असे म्हणतत ना ।..

**सविता एम.जाधव (नंन्नारे)**
मातोश्री जिजाऊ विद्यार्थींनी वसतिगृह क्र.२
पद-सहाय्यक

## माणुस म्हणून

चल माणसा भाकीत कर मन तुझ उघड कर जगण्याचा प्रवाह शिथील कर
सुकर कर सुजय कर ज्ञान घेऊन सज्ज हो शास्त्र घेऊन कर्ता हो
जीव-जीवाशी हर्ष कर धर्म होऊन शासन कर
साद देऊन प्रतिसाद हो आवाज ऐकुण भाषा हो
मना-मनाला साथ कर प्रयत्न तुझे सुफळ कर
सुकर्म करुन वंद्य हो हात देऊन मित्र हो
क्षणा-क्षणाला लक्ष्य कर कर्तृत्वाला तुझ्या अजिंक्य कर
वर्तमानातून भविष्य हो सावली देऊन दिशा हो
कणा-कणाला स्पर्श कर माणुस म्हणून राज्य कर

## माझ दैवत ''आई''

माझ दैवत उभ माझ्याच घरात आयुष्यभरासाठी ''आशिर्वाद'' देण्यास
माझ्या मना काहीच कळेना विसर मनाला लागलो वारीला
वारी-वारी करुन झालो मी बारीक, खर्चुनी घरच धन लागली मनास सल
सुखाच्या मी शोधात कपाळी बुक्का लावत माझ दैवत रात मी निघालो वारीत
देहु-आळंदी झाले पंढरी झाली काशीलाही गेलो मिसळलो मी वारीत गुलाल खोबरे उधळत
उशिराने कळुनि चुकले मनास ''वैभवाचं मंदिर'' त्यावर कळस तुळशीराम प्रसन्न सगळ्याकडे
सहभाग सुखदुखात सोबत मना हिरव रोप्टआली दुप्ती नयनी असावे मन माझे पोरके झले होते
घरी दैवत मी निघत वारीत मी निघत वारीत मी निघत वारीत माझे

**कल्पना भागवत**
विद्यार्थी कल्याण विभाग

## बंध

शब्दांचे हे बंध कधिच
मला कळले नाहित
जे कळले ते तुझ्याकडे
कधी वळले नाही.

तुटलेले शब्द मी पुन्हा कधिच
जोडले नाही
ते माझेच होते म्हणून त्यांना
मी सोडले नाही.

जरी हे शब्द माझ्या पासून
कधी विरले नाहीत
पण तुझ्या आठवणीत ते पून्हा
कधिच झुरले नाही.

शब्दाचे जुगार जरी तू
कधि खेळणार नाही.
या जुगाराच्या चालिवर मी कधी
जळणार नाही

जरी आयुष्याचा साथ कधी
तुझा माझा जुळणार नाही
तरी तुझ्यातील तु आणि
माझ्यातील मी, ही तुला कधी कळणार नाही

## तु

तुझ इथं असणं मला
माझ्या मनात कोणी सांगत आहे
सांगणाऱ्या मनांना मी मात्र भांडत आहे.

या अबोल भांडणाचा टोक
एवढा तिक्ष्ण होईल
अस कधि वाटल नव्हत
वाटलेल्या मनाला सुद्धा
हे कधि पटल नव्हत.

पटून न पटल्या गत
मी तसा वागत होतो
पण माझ्यासाठी तेच योग्य
असं मी सांगत होतो.

सांगून सांगून थकून सुद्धा
मनं माझं वळेना
साध पडलेल कोड मला
काही कळेना

साध्या बेरजेच्या
वजा करुण पाहत होतो.
उतार समोर असताना
प्रश्नाकडे पाहत होतो

मी सर्वस्व हरलो आहे.
हे तुला नाही सांगायचे
क्षण भर बघून तुझ्या कडे
आठवणीत तुझ्या झुरायचे

**सचिन कविराज पाटील**
९४०४८००९९५

# विरह

हृदयातील दु:ख
माझ्या डोळ्यातून
गळु लागले
आसवांचा गंध फक्त
मला, तूला ते कळू लागले

तुझ्या बोलीतील शब्द
माझ्या कडे येवून पळू लागले
कानात पडून ते सारखे जळू लागले

आठवणीत तुझ्या माझे मन
सैरा वैरा पळू लागले
क्षितीजा पल्याड जाऊन
तुझ्याकडे येवून घुटमळू लागले

तू माझ्या समोर नाही हे
डोळ्यांना ही सलू लागले
श्वासाचे महत्त्व आता
या शरीराला कळू लागले.



**सचिन कविराज पाटील**
९४०४८००९९५

## कॉलेज कट्टा

आज ही मला आठवतो
माझा कॉलेज कट्टा
जिथे चालायचा
आयुष्याच्या गोळाबेरजेचा सट्टा
जो तो आपापलं स्वप्न रंगवायचा
बोर झालो की कॅन्टीनकडे धावायचो
व एक कप चहा घेत घेत चहातल्या
पेल्यातले वादळाप्रमाणे भांडायचो
कुणालाच कुणाचे भविष्य माहित
नसायचे कुणालाच काय करायचे
काय व्हायचे माहित नव्हते
फक्त डिग्रीच बिरूद लावायचा
माहित होत डिग्री घेतल्यानंतर
सर्व काही करता येतं
Atlist कंपनीच्या गेटवर तरी
उभं राहता येत होतं
सर्वानाच धीरूभाई अंबानी
होता येत नाही पुढची स्वप्न
पाहता पाहता सध्यातरी
आयुष्य एन्जॉय करतोय...

**संदीप रामदासराव मोकळे**
M.E (M.I.T. College, Aurangabad.)

## बाप

मुलगा झाला जेव्हा
पेढे वाटतो तेव्हा
मुलास शोधता शाळा
स्वतः खातो खस्ता
पाटी पेन्सिल देतो
तो काळवंडला नुसता
मुलामध्ये पेरतो स्वप्न
स्वतः भोगतो भोग
कमी पडू देत नाही काही
करतो सारं मनाजोग
शिकून करतो नोकरी
घरी आने छान छोकरी
बायकोच्या आहारी जातो
बापाला लाथा देतो
तो फिरतो मग अनवाणी
डोळ्यात घेवून पाणी
बिघडलेल्या मुलाची
आठवत असतो कहाणी

**मनिषा बाबुराव सुरासे**
संशोधक विद्यार्थीनी अर्थ शास्त्र विभाग
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ
औरंगाबाद

## वस्तीगृह मुलींचे

बाई गं., बाई गं.......
एकच अजब घाई, गं घाई, गं.......
उगवता दिवस, आठवते वस्तीगृह मुलींचे खास गं खास गं.......
वस्तीगृहाची बात न्यारी गं, न्यारी गं.......
कार्यप्रारंभ करण्यापूर्वी होते दर्शन कुलगुरू निवासस्थानाचे गं, गं, गं,.......
नंतर समोर येता वस्तीगृहाचे प्रवेशद्वार बाई गं, बाई गं,
होते एक लगबग, घाई गं, घाई गं,.......
दररोज येते सवारी आमच्या संचालक सरांची, गं, गं, गं,.......
शिस्तीची, बाणेदारपणाची, गं, गं, गं,.......
प्रवेशद्वारातच होते, ओळख
आमच्या परिसराची स्वच्छतेची शिस्तीची,
नंतर, येते सवारी पर्यवेक्षिका मॅडमची, गं, गं, गं,.......
जाणून घ्यावी कामाची हातोटी बाई गं, बाई गं,
सर्वांना एकत्र करूनी दिला जातो, कामाचा धडा,
कधी प्रेमळ कधी कटु, सर्वस्वी सिमुख एकरूप होऊनी बाई गं. बाई गं,.......
सर्व वॉर्डन मॅडम एकत्र येता बाई गं. बाई गं,.......
हसतमुखाने काम करूनी घेती बाई गं. बाई गं,.......
नंतर येता बारी सफाईगार मावश्यांची बाई गं, बाई गं .......
जो आहे कणा सर्वस्वी वस्तीगृह लख्ख बनविण्यास हसतमुखाने सदैव उभा भाई गं, बाई गं,
रात्र शिफ्टच्या मावशी पहारा कर तो मुलींचा आजारपण,
मुलींचे आरोग्य अडचण सांबाळण्यास सदैव तत्पर बाई, बाई गं.
नंतर येतेबारी आमच्या वसतीगृहातील मुलींची, बाई गं, बाई गं,
कोमल, नाठाळ, सुंदर, हसमुख बाई गं, बाई गं,
कधी-कधी गरज आहे, शिस्तीची, नैतिकतेची, मूल्यांची, जोपासना करण्याची बाई गं बाई गं.
नंतर येते बारी वसतीगृहातील व्यस्थापकांची बाई गं बाई गं.
आम्ही सर्व व्यवस्थापिका एकत्र मिळुनी सांभाळतो धुरा वस्तीगृहाची बाई गं बाई गं.
प्रवेशापासून होते सुरूवात नवीन वर्ष नवीन चेहरे नवीन वर्षातच होतो हर्ष, अनेक समस्या
अनेक अडचणी दूर करूनी देतो आनंद असे वस्तीगृह खास, खास, बाई गं, बाई गं.......

**ज्योत्सना एस. प-हे/सौ. पंडुरे**
सहाय्यक ( क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वसतीगृह क्र.१)

## लेकरू भिमाचं



विकास ध्यास घेऊनी, चीज करतंय श्रमाचं
विद्यापीठाच्या उन्नतीसाठी, झटतय लेकरू भिमाचं ।

बाबांच्या नावाचं विद्यापीठ चालवणं, असतंय भारी,
अल्पावधीतच लेकरानं, घेतली गगनभरारी,
प्रयत्नाची पराकाष्टा करून, अनुदान आणलंय रूसाचं,
विद्यापीठाच्या उन्नतीसाठी, झटतय लेकरू भिमाचं ।

विज्ञान असो की तंत्रज्ञान, साहित्य असो की वाणिज्य,
सर्व शाखांना दिले बळ, उभारण्या प्रगतीचे स्वराज्य,
केंद्रिय विद्यापीठ करण्यासाठी, योगदान देतंय मोलाचं,
विद्यापीठाच्या उन्नतीसाठी, झटतय लेकरू भिमाचं ।

फुलविण्या विद्यापीठाचे प्रांगण, प्रगतीचा वृक्ष लाविला
थेंब थेंब पाण्याचा अडविण्यासाठी, भगीरथ प्रयत्न केला,
आंतरराष्ट्रीय मानांकनासाठी, घाम गाळतया श्रमाचं,
विद्यापीठाच्या उन्नतीसाठी, झटतय लेकरु भीमाचं ।

विद्यापीठाच्या उन्नतीसाठी बळ तयांना देऊ,
विसरून सारे रूसवे फुगवे, हातभार तयाना लावू
गुरगुरण्या सज्ज झाला, दुध पिऊन वाघिणीचं,
विद्यापीठाच्या उन्नतीसाठी, झटतय लेकरू भीमाचं ।



**डॉ. नारायण पंडूरे**
वनस्पतिशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# बाप

शिक्षक: जमलच तर माफ करा !

गौतमा, अत् दिप भव ! चा मंत्र दिला विश्वाला तुम्ही, पण शांती, प्रकाश अन् सत्याचा पथ केव्हाच सोडलाय आम्ही, सिध्दार्थ ॲण्ड खॉन नावाचा धडा इंग्रजीच्या पुस्तकात, मारणाऱ्यापेक्षा वाचवणाराच असतो महान अस छडी मारून मास्तर सांगतात,

म्हणून हे तथागता, जमलच तर माफ करा !

तुकोबा, चार वेदांचाही बाप असणारी लिहली तुम्ही गाथा भटकलेल्या टाळक्यांचा ठिकाणावर आणला माथा, अन् आजचे शिक्षीत आम्ही करतो, पुरोगामीत्वाची बात, चौकटीला बाहूली अन् लिंबु बांधून दाखवतो ज्योतिषाला हात

शिवबा, आपण पेरल स्वराज्याच स्वप्न आणि पगड जातीच्या मनात,

फडकावलात स्वाभीमानाचा भगवा, केलत अथवा जागाला, पण जाती धर्माच लेखन त्याऊन बंदीस केल जातय चौकटीत आपणाला.

महाराज तुमच्या 'शिवशाहीत' स्त्री असायची निर्भय पण आमच्या लोकशाहीत स्त्री ची होतेय निर्भया.

म्हणुन महाराज ...... जमलच तर माफ करा......!

ज्योतीबा फुल्यांच्या बुधवार पेठेत तुम्ही केलीत सुरू शाळा आज मात्र सुरू झालाच तिथच नंगा चाळा. 'शिक्षणाच्या आयचा घो' करून आणलय मुल्यशिक्षण, खरं सांगतो झेपत ना नाही, विनामूल्य शिक्षण, सहिष्णु असहिष्णुतेच्या वादात मुकाट बसतो सारे, कारण बंडलेयचा वादांतत मुकाट बसतो सारे, कारण बंदखोल्याचा होतो इथे, कलबुर्गी, दाभोळकर, पानसरे, म्हणुन हे महात्मा, जमलय तर माफ करा.....!

बाबासाहेब, संहावीच्या भिमष्योतीनं उध्दारिले कोटी कुळाला स्वातंत्र्य क्षमता, बंधुत्व न्यायाची शिक्षण दिलीत बहुजनाला, आज विधमतेची --------- काही टाळकी पसरवत आहेत जनात,

बंधुत्व नव्हे तर शत्रुत्वाचा वणवा पेटवायच मनात :<br>
शेतकऱ्यांच्या गळयात फाजा, व्यापारी माला माल:<br>
म्हणून हे ज्ञानसुर्या, जमलच तर माफ करा .....!<br>
नैतिकतेचे वाजले की बारा,<br>
द्रिकाचा आटलाय झरा,<br>
म्हणून हे महापुरूषांनो जमलय तर माफ करा.......!



**नारायण वसंतराव लांडगे**<br>
एम.ड, मानशास्त्र ( द्वितीय वर्ग)<br>
मो. ९०२९२४४७०६

## आई

अथांग सागरा सारखी माया
प्रत्येक गोष्टीत चूक झाल्यास
तितक्याच मायेने माफ करणारी
मैत्रिणी सारखी वाटणारी

प्रत्येक क्षणाला पाठिंबा देणारी
संकटाना धैर्याने सामोरे जाण्या
धमक निर्माण करणारी
परिस्थिती पुढे हार न मानणारी

स्वाभिमानी, कष्टाळु, प्रेमळ
प्रत्येकाला आपल्यास करणारी
कुठल्याही गोष्टीचा अभिमान
गर्व, अहंकार, नसणारी

दुसऱ्याच्या सुखाला आपलं सुख मानणारी
अथांग सागरासारखी माया असणारी
अशी करूणा वत्सव्यक्ती
माझी माय, माझी माय



## 'ती......'

नजरेस नजर 'भिडली' तुझ्यावरी,
मध्येच पापणी हलवू नकोस,
वेडा झालो तुझ्यासाठी,
मध्येच सोडूनी जाऊ नकोस....

तू मधुशाला ..... तू मधुबाला .....
रूपवती तू ते लोभसवाने
मज जीव जुडला तुझ्यावरी.....

तुझसी बोलावे ..... बोलतच रहावे
खुप तुझे ते उरी जपावे,
तुझशी भेटुनी, तुझेच व्हावें
प्रेमगीत ते गात रहावे.

माझा श्वास तू, अन् विश्वास तू,
देहामधल्या नसा - नसात तू,
कल्पना तू, वास्तव्य तू
सुगंधी कुलातील सुगंधही तू

हे प्रेमदेवते तुलाच भाजतो सदैंव मी ,
सत्य बोल हे माझे, तु माझी अन् तुझाच मी.

: नार्य :

**बाबासाहेब रामभाण पवार**
**विद्यार्थी विकास डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद**
**मो. ९०२९२४४७०६**

# शोध

हे माझ्या मनात अंकुरणाऱ्या लेखका
तुला चाह आहे दु:खाची
दु:खच अणकुचीदार होवून टोचत राहण
हेच तुझ्यातल लेखकपण जिवंत ठेवू शकत
निदान नाही लिहता आल तरी
माणुसपण राहत आपल्याकडे
काही दिवसांपासुन पाहतोय मी
तु रमतोयस त्या तसल्या गोष्टीत
ज्या तुला दु:खापासुन दूर लोटतायेत
तुझं कुरतडत जाण
पार कमी होत चाललय
रात्रीचं काळ जनावर
आता दिसतच नाही तुला
आणि कटर म्हणजे
तुझं वजन वाढत चाललय
ही ही तथाकथित सोंग
परवडणारी नाहीत तुला
तुला आठवायलाच हव्यात
तुझ्या त्या दु:खाने लदबदलेल्या ओळी
एक रात्र असती तरी
समजु शकलो असतो
दोन रात्री असत्या तरी
समजु शकलो असतो
गेल्या कित्येक रात्री
कित्येक महिने माझं मन
स्मशान अंधाऱ्या कोठडीत
पाये तुटुन पडलयं
आता पुन्हा एकदा
फिर भटक
दु:खाच्या गुहा शोधत
आणि भोगुन घे दु:खाला
एकाग्र घेवून
अन् आता एवढा एकरुप हो
त्याच्या श्वासांचा हुसासा ऐक
त्याला नग्न होवून
सामोरा जा
दु:खाचा थेंब थेंब पिवून घे
आणि मग ये परत
या जगात
तुझ्यातलं सर्जन जन्माला
घालण्यासाठी....

**वाघमारे वालमीक विष्णू**
मराठी भाषा व वाङमय विभाग
डॉ.बा.आं.म.वि., औरंगाबाद



## विस्मरण

विस्मरणाचा आजा असायलाच
हवा प्रत्येक सर्जनशील माणसाला
काही गडद नकोश्या
सावल्या पाठ सोडत नाही तेव्हा
हा आजारच मित्र बनतो जीवाभवाचा
सगळ्या गोष्टी विसरणं
फायदेशीर एका ठरावीक टप्प्यावर
सर्जनशील म्हणून जगण्यासाठी
हे विस्मरणाचं वरदान
देणारा कुणी असेल
तर त्याचं महत्वं
प्रत्येक पिढीत कचीच
कमी होणार नाही

**पवन धुळगडे**
(इतिहास विभाग)



## दिवस

मंतरलेले दिवस असतात
प्रत्येकासाठीच
प्रेम झाल्यावर
पण,
सराळसोट आयुष्यही जगता
आलं पाहिजे
प्रेमाचा शेवट अपेक्षित
नाही झाल्यावरही
कोणी कोणाला दोष
देण्यात अर्थ नसतो
तर,
वेळच वाईट असते
प्रेम करणाऱ्या प्रत्येक पिढीसाठी
प्रत्येक टप्प्यावर
वास्तवाला धरुनच
पाऊल उचलावं
म्हणजे सगळ्याच अवघड
गोष्टी सोप्या वाटतील नक्कीच.

**पवन धुळगंडे**
(इतिहास विभाग)

## असुरी दुःख

ओळखीच्या दु:खावर
पांघरुणही घालता येईल
पण,
अनोळखी दु:ख नेहमीच
असूरी हस्य करतच
आंगतूकपणे कधीही येतं
येताचक्षणी धाडधाड
मनाचे हळवे कपो ठोढवंत
तरीही असेही काही कप्पे
असतात मनाला
तिथे आपल्यालाही ईच्छा
असूनही जाता येत नाही
अनोळखी दु:खचा येण्यानं
सगळी हापातभर कमावलेली
समाजासाठीची सोशिकता
चटकण अदृश्य होते
नि आपण ओक्सी वोक्सी
रडायला लागतो पण
यावेळी आसवांनीही
बंड पुकारलेलं असतं

**पवन दौलतराव धुळगंडे**
(इतिहास विभाग)

## साथ

आपल्याला पक्कं माहित असतं
सुख:च्या बाजूलाच दु:ख
फतकळ मारुन बसलेलं असतं
वाटतं प्रत्येकालाच चिरकाल
टिकावी सोबत आपली
पण,
नियतीचे सगळेच फासे
सोयसे नतात कधी पडत
ओळखीचं होऊन अनोळखी
बनावं लागणं यासारखं
टोचणारं दुसरं काय असेल?
सगळं काही विसटलेलं
असलं तरी,
एकमेकांना दाखवलेली
स्वप्न चिरंतन राहतील नेहमीच. कारण
स्वप्नांना कधी एक्साप्तयरी
डेट नावाचा प्रकार बसतो
प्रत्येक पिढी आपली
अधूरी स्वप्ने पुढच्या
पिडीतच शोधत असते
हेही तितकेच नवल !

**पवन धुळगंडे**
(इतिहास विभाग)

# वाळवंट

मर्दा, काही काम केलं पाहिजे,
दिवस आपले तेजीचे,
आपण तर काही पण करू शकू ॥१॥

विहीर खोदली ..... कोरडी
कविता केल्या ...... पांचट,
धंदा उघडला .... दिवाळ निघालं,
हॉटेल टाकली ..... ग्राहक नाही
रनिंग केली ...... मिनीटात दमलो,
जॉब कराव म्हटलं तर ...... जागा नाही,
अभ्यास तर काही ...... कामाचा नाही,
परीक्षेपूरता केला ..... की झाला,
या सगळ्या विरुद्ध आंदोलन केलं,
तर तेही आदर्शहीन
च्यायला, कंबर मोडली आता ॥२॥
मर्दा, वाळवंटात उभा आहेस,
अन वादळ येत आहे,
आता उंट शोध लपायला,
नंतर काय उंटावरुन शेळ्या हाकल्या तरी जमतात
आपल्या पोटाच बघ
वाळवंटाचा बगीचा करण्याच्या
नादी लागू नकोस....
तुझ स्मशान होईल...

**अभिषेक अप्पासाहेब फड**
९१७२९७७७६१

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, औरंगाबाद

युवारंग





